
४० पैसे

१८।२।६७

# माणूस

साप्ताहिक



आज लोकशाहीचा चालक

उद्या 'सहा बाय तीन'चा मालक !

# रसाचा थेंबही फुकट न घालवणारा

## किर्लोस्कर उसाचा चरक

Regd. T. M.



किर्लोस्कर उसाचे चरक वापरल्यानें कोणत्याहि इतर चरकांपेक्षां अधिक काटकसर, कार्यक्षमता व कामाचा जलद उरक असा तिहेरि फायदा होतो. रोलर्स, गिअर्स व बेअरिंग्ज इत्यादी सर्व भाग भक्कम पोलाद, ओतीव लोखंड व गनमेटलपासून तयार केलेले असून वर्षानुवर्षें बिनतक्रार काम देण्याच्या दृष्टीनेंच त्यांची रचना केलेली असते. ५, १० व १५ हॉ. पॉ. आणि २, ४ व ६ बैलांकडून चालणारे असे निरनिराळ्या आकारांतील चरक तयार होतात.



निर्माता:

**किर्लोस्कर ब्रदर्स लिमिटेड,** किर्लोस्करवाडी, जि. सांगली.

R STUSA KM 5/62




एक समग्र साप्ताहिक

वर्ष : सहावे
अंक : तेहतिसावा
किंमत : चाळीस पैसे
वार्षिक वर्गणी : वीस रुपये

संपादक
श्री. ग. माजगावकर

संपादक मंडळ
अ. मा. साधू
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

व्यवस्था विभाग
अ. वा. गंधे
अ. वि. गणपत्ये

पत्ता — ४९१ नारायण, पुणे २.
दूरध्वनी — ५७३५१

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

## पत्र मैत्री

स. न. फेब्रु. ५

आपल्या 'माणूस'चा मी एक नियमित वाचक होतो. पण एक वर्षापूर्वी इकडे आल्यापासून एकही अंक वाचायला मिळाला नव्हता. आणि गेल्या महिन्यात 'माणूस'चा दिवाळी अंक वाचायला मिळाला. अंक वैशिष्टयपूर्ण आणि संपूर्णपणे वाचनीय आहे. या पत्राचे कारण म्हणजे दिवाळी अंकातील श्रीमती हंसा वाडकर यांची आत्मकथा, "सांगत्ये ऐका", इतकी नावीन्यपूर्ण आणि सुरस आत्मकथा आतापर्यंत वाचली नव्हती. हंसाबाईंच्या धाडसाबरोबरच त्यांच्या स्वभावातले काही नवे पैलू समजून आले. चित्रपट नियतकालिकांतून नेहमी येणाऱ्या नटनटींच्या पोकळ आणि ठराविक चरित्रांपेक्षा हे काहीतरी एकदम वेगळं वाटलं. अभिनंदन !

**बी. एम. गार्डे**
बाहरेन (अरबी आखात)

स. न. फेब्रु. ८

मी 'माणूस'चा नियमित वाचक आहे. गेल्याच अंकात इंदूरच्या 'नाटयभारती' या संस्थेची माहिती वाचली. माहिती देऊन आपण चांगली कामगिरी पार पाडली आहे.

या परिचय-लेखाचे लेखक कोण ?

**काशीनाथ गुपचूप, पुणे.**

[ नाटयभारती परिचय-लेखाचे लेखक श्री. रवींद्र गुर्जर आहेत. नजरचुकीने नाव देण्याचे राहिले—सं. ]

# कौल यांनी न सांगितलेली कहाणी

लेफ्टनंट जनरल ब्रिजमोहन कौल यांचे आत्मचरित्र सध्या बरेच गाजत आहे. सर्वसाधारणत: सेनानींचे आत्मकथन नेहमीच रोमहर्षक आणि खळबळजनक असते. याचे एक कारण तर असे की ते जीवन मोठे कर्तृत्वसंपन्न व पुरुषार्थी असते. शिवाय जेव्हा प्रथम लढाई सुरू होते, तेव्हा रणांगणावरील हालचालींसंबंधी जे गूढतेचे वातावरण निर्माण झालेले असते ते जाणून घ्यावयासही सर्वसामान्य वाचक उत्सुक असतो. १९६२ च्या ऑक्टोबरमध्ये कम्युनिस्ट चीनने भारतावर आक्रमण केले तेव्हा नेफा विभागातील सैन्यदलाचे नेतृत्व कौल यांच्याकडे होते. या युद्धात भारताला नामुष्की पत्करावी लागली आणि मग साहजिकच कौल यांच्यावर टीकेचा भडिमार सुरू झाला. त्या वेळी कौल यांना काहीच सांगता येण्यासारखे नव्हते. त्यामुळे सरकारी सेवेतून निवृत्त झाल्यानंतर त्यांनी आत्मचरित्र लिहावयाचे ठरविले. त्यात नेफातील नामुष्कीला आपण कसे जबाबदार नाही, याचा ते खुलासा करणार होते. इतकेच नव्हे तर या नामुष्कीला नेमके कोण जबाबदार आहे, हेही त्यात येणार होते. त्यामुळे त्यांच्या आत्मचरित्रासंबंधी प्रकाशनापूर्वीच बरीच उत्सुकता निर्माण झाली होती. या आत्मचरित्राला त्यांनी आकर्षक नाव दिले– ' न सांगितली गेलेली कहाणी ! '

या ' कहाणी'चा प्रकाशकही चतुर असावा. त्याने या ' कहाणी'तील खळबळजनक भागाचा त्रोटक वृत्तांत एका वृत्तसंस्थेमार्फत सर्व वृत्तपत्रांत प्रसिद्ध होईल याची तजवीज केली. नेफातील नामुष्कीला पं. नेहरू, कृष्ण मेनन व मोरारजी देसाई जबाबदार आहेत हे कौल यांचे विधान वृत्तपत्रांतून प्रसिद्ध होताच ' न सांगितल्या गेलेल्या कहाणी'ला भलतीच मागणी येऊ लागली.

कौल यांनी आपले आत्मचरित्र लिहिले आहे ते अतिशय खुसखुशीत शैलीमध्ये. बंदूक हाताळणारा सेनानी लेखणीही तितक्याच समर्थपणे हाताळू शकतो याचा ही ' कहाणी ' वाचताना सतत प्रत्यय येतो. परंतु कौल यांची प्रारंभीची ही खेळकर

वृत्ती नेफा-प्रकरण लिहिताना कोठल्या कोठे लुप्त होते आणि साऱ्या जगावर चिड-लेले कौल आपल्याला वाक्यावाक्यांतून दिसू लागतात. नेहरूंपासून सर्वांवर ते वार करीत चालल्याचे दिसून येते. त्यांच्या या माऱ्यांतून त्यांचे वरिष्ठ अधिकारी व सहकारीही सुटलेले नाहीत. हा सारा कथाभाग लिहिताना कौल वैयक्तिक टीकेच्या पातळीवर उतरले नसते आणि त्या वेळी जे काही घडले त्याचे वस्तुनिष्ठ विवेचन करण्याचा संयम त्यांनी बाळगला असता तर त्यांना अपेक्षित असलेला कार्यभाग अधिक चांगल्या रीतीने सफल झाला असता.

## गैरसावध नेतृत्व

पं. नेहरूंनी आपल्या कारकीर्दीत शांतता आणि अलिप्ततावाद या दोन तत्त्वांचा इतका उद्‌घोष चालविला होता की, त्यामुळे संरक्षणाच्या बाबतीत पूर्णतया दुर्लक्ष झाले हा कौल यांचा आरोप निरपवाद आहे. शांततेची अहोरात्र जपमाळ ओढणाऱ्या भारतावर कोणीही आक्रमण करणार नाही, असे पंडितजींना वाटत होते. त्यातूनही जपानी आक्रमणाशी यशस्वी टक्कर देणाऱ्या चीनबद्दल त्यांना प्रारंभापासूनच विशेष प्रकारचे ममत्व वाटत होते. १९५६ मध्ये चीनने लडाखमधला अकसाई चीन हा भाग व्यापला. त्यानंतर १९५९ मध्ये नेफातील लोंगजू येथे भारतीय ठाण्यांवर गोळीबार केला. या दोन घटना घडल्यानंतरही चीनबाबत आपले सरकार गैरसावध राहिले व त्याचीच निष्पत्ती नेफातील नामुष्कीत झाली. या काळात कृष्ण मेनन हे पंडितजींचे प्रमुख सल्लागार होते. कोणताही समाजवादी देश आक्रमणशील नसतो हा कम्युनिस्टांचा लाडका सिद्धांत मेनन पंडितजींना समजावून देत होते. चीनने उघड आक्रमण केले २० ऑक्टोबर रोजी. परंतु २ ऑक्टोबर रोजी नेहरू आणि मेनन यांनी त्या वेळचे सरसेनानी जनरल थापर यांना असे सांगितले की, चीन आपल्यावर आक्रमण करील, असे आम्हांला वाटत नाही. केंद्रीय नेतृत्वाची चीनबाबतची ही सारी उदासीनता कौल यांनी आपल्या आत्मचरित्रात तपशीलवार नमूद केली आहे.

कौल आणि नेहरू यांचे संबंध अतिशय निकटचे होते, असे तेव्हा मानले जात होते. ही समजूत खरी होती असेही या पुस्तकावरून दिसते. केवळ संरक्षणापुरतीच त्यांची चर्चा मर्यादित राहत नव्हती. नानाविध विषयांवर कौल आणि नेहरू यांच्यांत मनमोकळी चर्चा झाल्याचे उल्लेख ठायीठायी आहेत. सरसेनापतीला डावलून कौल पं. नेहरूंकडे जाऊ-येऊ शकत होते व त्यामुळेच नेफातील नामुष्कीनंतर, जनमताचा कौल यांच्यावर रोष झाल्यानंतर पंडितजींनी आपली पाठराखण केली नाही याचीच कौल यांना विशेष चीड आलेली दिसते. सैन्यातील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या नेमणुकीबाबतचे नेहमीचे नियम मेनन यांच्या काळात धाब्यावर बसविले जात होते, अशीही त्यांनी तक्रार केली आहे; पण मेनन यांच्या तऱ्हेवाईक स्वभावाचा त्या वेळी फायदा घेण्यात कौल हेच प्रमुख होते हे नाकबूल करता येणार नाही.

या कारणामुळेच त्यांनी सांगितलेली कहाणी जेवढी निःपक्षपाती व समतोल व्हावयास हवी होती, तेवढी समतोल राहिलेली नाही. कौल यांनीही ही कहाणी लिहिताना काही हातचे राखून ठेवल्याची शंका हे पुस्तक वाचताना मनात येत असते. या 'न सांगितल्या गेलेल्या कहाणी 'तही बरेच काही सांगितले गेलेले नाही.

उदाहरण सांगावयाचे झाले तर वॉलाँग विभागाचे देता येईल. कामेंग विभागात आपला पराभव कसा झाला व का झाला हे मोठ्या विस्ताराने सांगणाऱ्या कौल यांनी वॉलाँगसंबंधी बरीचशी मुग्धता पाळली आहे. वॉलाँग हा नेफामधील असा एकच विभाग होता की, जेथे आपल्या सैन्यदलाने चिनी सैनिकांशी चांगली झुंज दिली. या विभागात घुसलेल्या सर्व चिनी सैनिकांना आपली शस्त्रास्त्रे तेथेच टाकून पळ काढावा लागला. वॉलाँग भागात अशी मर्दुमकी गाजविणाऱ्या सेनाधिकाऱ्यांचा व जवानांचा सरकारने मोठ्या गौरवपूर्वक उल्लेख केलेला आहे. परंतु ही कर्तबगारी गाजविणाऱ्या आपल्या हाताखालच्या सेनाधिकाऱ्याचा साधा नामोल्लेखही कौल यांनी कटाक्षाने टाळला आहे.

## होशियारसिंगांचा अनुल्लेख

त्से-ला खिंडीतून माघार घेतल्याबद्दल आपल्या हाताखालच्या सेनाधिकाऱ्यांवर कौल यांनी ठपका ठेवला आहे. ब्रिगेडियर होशियारसिंग हे तर उघड उघड आपल्या विरुद्धच होते असेही त्यांनी म्हटले आहे. त्से-ला खिंड झुंजविणे ही किती अशक्यप्राय गोष्ट होती व आपल्या तेथील तुकडीजवळ किती अपुरा शस्त्रसाठा व तुटपुंजी वस्त्रप्रावरणे होती, ही गोष्ट कौल यांना माहीत होती. त्से-ला खिंडीतून खाली उतरणाऱ्या शत्रुसैनिकांच्या टोळधाडीला अडविता अडविता होशियारसिंग धारातीर्थी पडले. या शूर सेनाधिकाऱ्याने आपले प्राण जाईपर्यंत शत्रूची आगेकूच रोखली होती. भारत सरकारने मरणोत्तर पारितोषिक देऊन होशियारसिंगांचा गौरव केला आणि त्यांचे हे वीरकृत्य सोयीस्कर रीतीने विसरून कौल यांनी त्यांच्यावर टीकेचा वर्षाव केला आहे. होशियारसिंग आपली बाजू मांडण्यास हयात नाहीत, ही गोष्ट कौल यांच्या पथ्यावर पडली. त्यामुळे एकीकडे प्रधानमंत्री, अर्थमंत्री व संरक्षणमंत्री यांनी आपल्याला पुरेसे सहकार्य दिले नाही, अशी तक्रार करणारे कौल जेव्हा होशियारसिंगांसारख्या आपल्या कर्तव्यनिष्ठ कनिष्ठांबद्दलही अनुदार उद्‌गार काढतात तेव्हा त्यांचा सारा बचाव लटका वाटतो.

वॉलाँगमधील लढाई चालू असताना आपले मोर्चे नीट बांधण्यासाठी अवधी मिळावा, म्हणून तोफखान्याचा वापर करून चिनी सेनेची रसद तोडण्याचे कार्य हाती घ्यावे, असे कौल यांना त्यांच्या हाताखालच्या एका सेनाधिकाऱ्याने सुचविले होते. परंतु कौल यांनी ही सूचना फेटाळून लावली. या वेळी कौल इतके निराश मनःस्थितीत होते की, ब्रिटन-अमेरिकेसारख्या एखाद्या बलाढ्य राष्ट्राची मदत घेतल्याशिवाय आपला बचाव होणे अशक्य आहे, असे त्यांनी दिल्लीला कळविले होते. युद्ध

सुरू झाल्यानंतर सेनापतीच्या विचारात जो एकप्रकारचा दृढनिश्चय हवा असतो त्याचा कौल यांच्या स्वभावात अभाव होता व त्यामुळेच आपल्या कनिष्ठांच्या सूचनांचा विचार करण्याइतका तरतमभाव त्यांना त्या वेळी दाखविता आला नाही.

अर्थात् नेफातील नामुष्कीला कौल हे एकटेच जबाबदार आहेत, असे म्हणणे निखालस चुकीचे ठरेल. नेफामध्ये चिनी आक्रमणाला तोंड देण्याइतके सामर्थ्य आपल्यात नाही, हे माहीत असतानाही ही वस्तुस्थिती नेहरूंना सरळ आणि स्पष्ट शब्दांत सांगण्याऐवजी आपल्या हाताखालच्या अधिकाऱ्यांना व जवानांना हिमालयाएवढे अशक्यप्राय असणारे कार्य करावयास लावून प्रारंभीच्या काही दिवसांत त्यांनी केंद्रीय नेतृत्वाला व पर्यायाने जनतेला अंधारात ठेवले ही गोष्ट कौल यांना नाकारता येणार नाही. आपल्या आत्मचरित्रात त्यांनी आडवळणाने ही गोष्ट कबूलही केली आहे. परंतु तसे करतानाही त्यांनी आपल्या कनिष्ठांवर जो दोषारोप ठेवला आहे तो अनुचित आहे व त्यामुळेच ही 'न सांगितली गेलेली कहाणी काही ठिकाणी डागळली गेली आहे.

कौल यांनी आपल्या या आत्मचरित्रात शेख अब्दुल्ला यांच्या अटकेसंबंधी पं. नेहरूंचा दृष्टिकोन कसा विरोधी होता याची खळबळजनक माहिती दिली आहे युवराज करणसिंग यांनी १९५३ मध्ये शेख अब्दुल्लांच्या अटकेचा जो हुकूम काढल त्यास पंडितजींचा विरोध होता, असे कौल यांनी म्हटले आहे. परंतु करणसिंगांनी याचा इन्कार केला आहे. कौल यांना खरे म्हणजे या गोष्टीची एकच बाजू माहीत होती. पंडितजी जसे मुत्सद्दी होते तसेच राजकीय मंचावरील महान नट होते ही कौल यांना कळू शकली नाही व म्हणूनच त्यांनी असे विवाद्य विधान केले. एकीकडे पंडितजींनी शेख अब्दुल्ला यांच्या अटकेच्या हुकुमाला मान्यताही दिली व दुसरीकडे या अटकेला आपला विरोध आहे अशी बातमीही निकटवर्तीयांमार्फत प्रसूत होण्याची खबरदारी घेतली. पंडितजींचे हे दुहेरी व्यक्तिमत्त्व कौल यांच्यासारख्या सेनाधिकाऱ्याला आकलन होणे शक्य नव्हते. नेहरूंचा विरोध असता तर शेख अब्दुल्ला यांना अकरा वर्षे तुरुंगात ठेवण्याची कोणाचीच हिंमत नव्हती एवढे तरी कौल यांनी ध्यानात घ्यावयास हरकत नव्हती. परंतु 'न सांगितली गेलेली कहाणी' सांगण्याच्या भरात कौल यांना तेवढा विवेक राहिलेली दिसत नाही.

नपोलियनकडे एकदा एक सेनाधिकारी बढती मागण्यासाठी आला होता, तेव्हा नेपोलियनने त्यास एकच प्रश्न विचारला, "तुझं नशीब कसं काय आहे?' पं. नेहरूंसारख्या महान नेत्याची मेहरबानी लाभण्याचे नशीब लाभलेल्या कौल यांना या नशिबाने रणांगणावर मात्र दगा दिला आणि त्यामुळेच आत्मचरित्र लिहिताना आपल्या फुटक्या नशिबावर ते सारखे चिडलेले दिसतात. या 'न सांगितल्या गेलेल्या कहाणी'तही बऱ्याच गोष्टी सांगितल्या गेलेल्या नाहीत त्या या त्राग्यापायीच. ●

**सदाशिव पेठकर**

# मुक्ताफळे



## □ येरा चिखलचि उरे !

व्यथांचे जनक कथा सांगू लागल्यामुळे 'कथा सांगती जनक व्यथांचे' हा कार्यक्रम रंगत जाण्याचा धोका मागेच व्यक्त केला होता. आता खरे म्हणजे लेफ्ट. कौल यांच्या या भिकार पुस्तकावर तुटून पडायला हवे होते ते पंतप्रधान इंदिराजी, कृष्ण मेनन, यशवंतरावजी व जनरल चौधरी यांनी. पण यांपैकी कुणीच काही बोलत नाही; कारण शिळ्या कढीला ऊत आणण्यात आता काय अर्थ आहे ! चिनी थोडासा आपला मुलुख घेऊन गेले, झाले गेले चाऊला मिळाले. आता उगाच यावर वादंग कशाला...? परंतु ही मंडळी बोलत नाहीत तेव्हा लेफ्ट. जन. कौल यांच्या म्हणण्यात खूपच तथ्य असावे, अशी टीका आता सुरू झाली आहे. मुंबईच्या 'टाईम्स' पत्रात निराद चौधरी लिहितात—

"दुसऱ्या एखाद्या देशात असे काळेबेरे उघडकीस आले असते तर धिःकाराचा असा आवाज उठला असता की, सरकारचे अस्तित्व धोक्यात आले असते. असे असूनही ज्या अर्थी ही सर्व मंडळी शांत आहेत त्या अर्थी लेफ्ट. जन. कौल यांच्या म्हणण्यात तथ्य दिसते."

कमाल आहे ! म्हणजे हे पुस्तक निवडणुकीला पंधरा दिवस असताना, मेनन पडावे, सरकार कोसळावे, यासाठीच प्रसिद्ध केले आहे काय ? पंडित नेहरूंनी देशाला बनवले, असाही एक नवा आरोप निराद चौधरी करतात. त्यांचे म्हणण असे—

"दि. १२ ऑक्टोबर १९६२ रोजी पंडितजींनी अशी घोषणा केली की, भारतीय सैन्याला, नेफामधून चिन्यांना धक्के मारून हाकलून देण्याची आज्ञा देण्यात आली आहे. दि. १३ ऑक्टोबर १९६२ च्या वृत्तपत्रांत घोषणा जाड जाड मथळ्यांनी प्रसिद्ध झाली. आता कौल यांच्या हकीकतीवरून असे दिसते की, दि. ११ ऑक्टोबर

१९६२ ला रात्री दिल्ली येथे झालेल्या संरक्षण मंडळाच्या बैठकीत चिनी सैन्याविरुद्ध आक्रमक कारवाई न करण्याचा निर्णय पक्का करण्यात आला होता. या बैठकीला लेफ्ट. जन. कौल व सेनादलाचे सर्व प्रमुख हजर होते. पंडित नेहरू, कृष्ण मेनन व संरक्षणसचीव अशी इतर मंडळी या बैठकीत होती. नेहरू अध्यक्षस्थानी होते.

असे असताना दि. १२ ला चिन्यांना नेफाबाहेर फेकण्याची आज्ञा दिल्याची घडघडीत खोटी घोषणा करून पंडितजींनी देशाला बनवले व ही गोष्ट त्यांनी कुणातरी राजकारणी माणसाच्या सल्ल्याने मुद्दाम केली, असा निष्कर्ष निराद चौधरींनी काढला आहे. युद्ध आणि शांतता अशा महत्त्वाच्या पर्यायांबाबत पंडितजींनी देशाची दिशाभूल केली, असा हा आरोप करवतो तरी कसा हेच कळत नाही ! घरावर जप्तीचे वॉरंट येण्याची वेळ झाली तरी घरातला कर्ता माणूस घरातल्या मंडळींना हेच सांगतो की, आज महत्त्वाच्या कामाकरता सरकारी माणसे आपल्या घरी येणार आहेत. आपल्यावर अवलंबून असलेल्या माणसांच्या प्रेमाखातरच ही गोष्ट 'कर्ती' माणसे करतात. अशी संपादणी करावी, असा सल्ला कौल यांनी सूचित केल्याप्रमाणे कृष्ण मेनन यांनीच दिला असेल तर ते किती चतुर व प्रेमळ आहेत हेच यावरून सिद्ध होते. या पुस्तकात पंडितजींची मुळीच बदनामी नसून मेननचा हा छुपा प्रचार दिसतो. मेनन 'चतुर' व 'प्रेमळ' आहेत हे सांगून त्यांना निवडून आणण्याचा हा डाव दिसतो.

चिखलात दगड फेकणाऱ्या या निरुद्योगी माणसांना चिखलात उगवलेली 'कमळे' कशी दिसत नाहीत ? पंडित नेहरू कशाही परिस्थितीत सतत अठरा-वर्षे भारताचे पंतप्रधान राहिले म्हणूनच आज इंदिराजींचे नेतृत्व आपल्याला लाभले ना ? नाहीतर काय झाले असते, हा विचार आमच्या 'उघड्या' अंगावर काटा आणतो व आमच्या 'रिकाम्या' पोटातही गोळा आणतो !

## □ अतुल्य रोष

संस्थानिकांनो नीट कान देऊन ऐका. तुमचे वार्षिक तनखे आम्ही बंद करू, अशी स्पष्ट ताकीद तुम्हांला अतुल्य घोषांनी दिली आहे. जयपूरला त्यांनी सांगितले,

लठ्ठ लठ्ठ तनखे घेण्याचा या मंडळींना काय अधिकार आहे ? इकडची काडी तिकडे न करता यांनी एवढाले तनखे घ्यावे आणि जनतेने मात्र पोट भरण्यासाठी काबाडकष्ट करावे हा कुठला न्याय ?"

गेली १८ वर्षे हा न्याय आपण सहन केला. कारण सर्व राजे, राण्या, राजपुत्र कॉंग्रेसच्या तिकिटावर उभे राहत होते, निवडून येत होते, कॉंग्रेसला निवडून आणीत होते. परंतु आता या मंडळींची बुद्धी चळली आहे. फलटणचे राजे कॉंग्रेस सोडून गेले. कोल्हापूरच्या राजमाता कॉंग्रेसच्याविरुद्ध उभ्या झाल्या. जयपूरच्या राणीसाहेब गायत्रीदेवी यांनी तर कॉंग्रेसचे राज्यच संपुष्टात आणल्याची परिस्थिती निर्माण

केली आहे. बस्तरच्या राजाने गोंधळ घातला तो मिश्रांना कदाचित डुबकी देणार आहे. बडोद्याचे महाराज स्वतंत्र पक्षात जाणार होते—तूर्त त्यांना सुबुद्धी सुचली आहे. समर्थांच्या घरची श्वाने मालकालाच चावू लागली तर त्यांचे पट्टे काढून त्यांना बेवारशीच करणे बरोबर आहे.

या संस्थानिकांनी आणखी एक उपद्‌व्याप केला आहे. हे संस्थानिक आपआपल्या संस्थानात स्वतःच्या जयंत्यांची सार्वत्रिक सुटी अजून देतात. वर्षाचे दिवस ३६५ त्यांत काँग्रेसच्या थोर थोर नेत्यांच्या जयंत्या, मयंत्या साजऱ्या केल्यानंतर खाली दिवस उरत नाहीत. अशी खेचाखेच असताना या संस्थानिकांनी यांतले काही दिवस अडवावे याला काय म्हणावे ? शिवाय काँग्रेसचे एखादे मुख्यमंत्री गेले त्याच दिवशी सुटी द्यायची, असाही आमचा नियम नाही. कै. कन्नमवार आणि केनेडी एका दिवशी समजा गेले तर केनेडींच्या सुटीत कन्नमवारांची सुटी चालू शकली नाही ! ती निराळी द्यावी लागली होती. ही सुटी दिली त्या दिवशी तसे कुणीच गेले नव्हते ! याही बाबतीत अतुल्य घोषांनी संस्थानिकांना तंबी दिली आहे.

राष्ट्रपतींच्या जन्मदिवशीही सार्वजनिक सुटी देण्याची प्रथा नसताना हे संस्थानिक अशी जयंतीची सुटी देतात. ही गोष्ट आम्ही बंद करू !

हा अतुल्य रोष आहे ! एकदा आमच्या श्रेष्ठींचा रोष झाला की काय होते त्याची चुणुक घोषांनी दाखविली, ती या ऐदी मंडळींचे दोष बरोबर दाखवून ! हा चाणाक्षपणाचा कळस आहे.

फलटणचे राजेसाहेब, कोल्हापूरच्या राणीसाहेब यांचे तनखेच बंद करू पाहणारे आमचे अ—माजवादी अतुल्य घोष आणि या मंडळींना महाराष्ट्रात पाठिंबा देऊन समाजवाद आणू पाहणारी ' समिती ' यात अधिक समाजवादी कोण याचा विचार सुज्ञांनी करावा.

राजा—राज्यांचे आकर्षण सर्व जनतेला असते. ही भूक भागविण्यासाठी इराणचा राजा—राणी—राजकन्या यांचे दौरे आमचे सरकार मुद्दाम आखते. जॉर्डनचे राजेसाहेब, इंग्लंडच्या राणीसाहेब यांनाही बोलवता येईल. त्यासाठी देशी राजाराण्यांची जरूर नाही ! पोप असताना शंकराचार्य हो कशाला ? समाजवादी भारतात जयपूरचे राजपुत्र कलेक्टर कचेरीत ६५—३—८५—४—१२० या वेतन श्रेणीत काबाडकष्ट करीत आहेत, फलटणचे युवराज रस्तेबांधणी खात्यात मुकादमाच्या जागेवर उन्हातान्हात मजुरांची हजेरी भरीत आहेत—अशी मनोहर चित्र निर्माण करण्याला आम्ही बांधलेले आहोत.

लक्ष्मीधरांवरचा आमचा रोष अतुल्य आहे ! व्होट फॉर काँग्रेस — !

## □ शंभर अपराधांपूर्वीच !

७ नोव्हेंबरला दिल्लीत गाईंनी शिंगे उभारली. त्यानंतर स्वर्णसिंग हे संरक्षण- मंत्री झाले. संरक्षणमंत्री झाल्यापासून या सदा हसतमुख चेहऱ्याने तोंडावाटे एक शब्दही काढलेला नाही. गेल्या २॥ महिन्यांत त्यांनी एवढे मौन पाळले आहे की, हेच का 'ते' स्वर्णसिंग अशी शंका येऊ लागली आहे. परवा मात्र स्वर्णसिंग एकदाचे बोलले. मौन न सोडता बोलले. तोफेच्या चौघड्याने त्यांनी 'पवाडा' म्हटला. पाकिस्तानचे भारतात टेहेळणीकरता आलेले विमान संरक्षणदलाने पाडले ! शब्दाचे बुडबुडे संपून एकदम तोफांचे चौघडे वाजले. ९७ वेळा आपल्या सरहद्दीत घुसून पाकिस्तानी विमाने परत गेली; परंतु यापूर्वी ती पाडली गेली नाहीत. का पाडली नाहीत कुणास ठाऊक ? नव्या संरक्षण मंत्र्यांनी मात्र शिशुपालाला शंभर अपराध पुरे होण्यापूर्वीच शासन केले ! एवढे विमान पाडले; निषेध झाला, अयुब रागावला; तरीही स्वर्णसिंग बोललेले नाहीत. स्वर्णसिंगांच्या वेषात अबोल कामराजांनी हे खाते आपल्याकडे घेतले आहे की काय आता असा संशय येऊ लागला आहे ! स्वर्णसिंग बोलत नाहीत, हसत नाहीत, दिसत नाहीत, याचे कारण फक्त तीन–चार महिनेच संरक्षणखाते त्यांच्याकडे आहे हे त्यांना कळले आहे की काय ? कारण भारतीय सेनादलातील तीन जनरल्स यंदा लोकसभेची निवडणूक कॉंग्रेसच्या तिकिटावर लढवीत आहेत. अर्थात पाकिस्तानचे विमान पाडून त्यांनी आपणही काही अगदीच असे तसे संरक्षण मंत्री नाही हे सिद्ध केले आहे. परंतु एखादा जनरल आलाच व संरक्षणमंत्रिपदावरून उचल- बांगडी झाली तर परराष्ट्र खाते काही पुन्हा सरदारजींकडे येत नाही. कारण छगलांनी लगेच आपला जम बसवला आहे. तेव्हा आपले पुढचे खाते कोणते या विवंचनेने स्वर्णसिंग अबोल झाले असावेत, अंतर्मुख झाले असावेत. उद्योग– व्यापार–अर्थ ही खाती त्यांना 'भौगोलिक' कारणामुळे सोयीची नाहीत. रेल्वेमंत्री होण्यात अपघातांचे भय व राजीनामा संभवतो ! जे खाते जगजीवनरामदेखील सांभाळू शकतात ते मागून घेण्यात काही अर्थ नाही. म्हणून स्वर्णसिंग अंतर्मुख झाले आहेत. एक सूचना करावीशी वाटते. स्वर्णसिंगांना उपराष्ट्रपती केल्यास त्यांचा सदा हसतमुख राहण्याचा गुण कारणी लागेल व पाकिस्तानचे विमान पाडणाऱ्या संरक्षणसिंगांचा हा यथोचित गौरव ठरेल. —ग्यानबा



# समीर विचार वारे

## □ विज्ञान आणि जागतिक शांतता

रसायनशास्त्र आणि शांतता या दोन क्षेत्रांत नोबेल पारितोषिक मिळविणारे जगद्विख्यात अमेरिकन शास्त्रज्ञ आणि विचारवंत लिनस पॉलिंग हे यंदाच्या आझाद स्मारक व्याख्यानमालेत दोन व्याख्याने देण्यासाठी नुकतेच दिल्लीला येऊन गेले. 'विज्ञान आणि जागतिक शांतता' या विषयावरील पहिल्या भाषणात त्यांनी अणुशस्त्रांच्या भयानक संहारक शक्तीचे तपशीलवार वर्णन केले. आजकालच्या समस्या जनतेला नीट समजावून देणे हे शास्त्रज्ञाचे कार्य आहे असे म्हटले व न्याय आणि नैतिकता यांच्यावर आधारलेल्या नवीन जगाला आवाहन केले.

सध्या जगात सर्वांत अधिक अणुशक्तिमान् देश अमेरिका व रशिया हे आहेत. त्यांतही १९६४ च्या आकडेवारीप्रमाणे रशियाजवळ ८०,००० मेगॅटन अणुशस्त्र-संभार आहे, तर अमेरिकेजवळ २,४०,००० मेगॅटन शस्त्रे आहेत. म्हणजे दुसऱ्या महायुद्धात रोज सहा मेगॅटन इतकी स्फोटक द्रव्ये वापरली जात होती, तेवढीच वापरून एखादे 'लहान' युद्ध चालविण्याचा अमेरिकेने विचार केला तर असे युद्ध १४६ वर्षे चालविता येईल ! पण एवढ्या प्रचंड संहारक शक्तीची अणुशस्त्रे तयार झालेली असल्यानेच तिसरे महायुद्ध झालेले नाही. अमेरिकेच्या किंवा रशियाच्या अणुशस्त्रसंभारापैकी अगदी थोडी शस्त्रे वापरली तरी जगातली बहुतेक सर्व मोठी शहरे नष्ट करता येतील.

अशा परिस्थितीत भारताने अणुबाँब करण्याचे ठरवले तर ते अत्यंत घातक होईल. भारताचा लष्करी खर्च पूर्वी राष्ट्रीय उत्पन्नाच्या २.२ टक्के होता तो वाढून ४.७ टक्के झाला आहे हेच अनिष्ट आहे. परंतु या परिस्थितीला अमेरिका जबाबदार आहे; कारण अमेरिकेने पाकिस्तानाला दीडशे कोटी डॉलर किंमतीचे शस्त्र-साहाय्य दिल्यामुळेच भारताच्या लष्करीखर्चात वाढ झाली आहे.

जगात आतापर्यंत जो अणुशस्त्रसंभार निर्माण झाला आहे त्याचे नियमन करण्याचे काम अणुशस्त्रधारी देश व युनायटेड नेशन्स या दोघांनी मिळून केले पाहिजे.

असे झाले तरच कुठल्याही एका देशाला स्वतःच्या मर्जीने अणुयुद्धाला प्रारंभ करणे अशक्य होईल. अणुशस्त्रे करणारे प्रत्येक राष्ट्र दुसऱ्या राष्ट्रांना अणुशस्त्रे करण्यास भाग पाडीत आहे. मात्र त्यामुळे संपूर्ण अणु-प्रयोग बंदीची शक्यता वाढत आहे. परंतु चीनच्या संमतीशिवाय अणुशस्त्रांचा अंत करणे शक्य नाही. म्हणून चीनला युनायटेड नेशन्समध्ये घेऊन सिक्युरिटी कौन्सिलचे सदस्यत्व दिले पाहिजे.

सध्या जो अणुशस्त्र चाचणी बंदीचा करार झाला आहे तो १९५९-६० साली झाला असता तर अणुकिरणयुक्त 'फॉलआउट'चे दुष्परिणाम जगाला भोगावे लागले नसते. हा करार १९६३ साली झाला त्याच्या आधी १९५९ ते १९६३ या चार वर्षांच्या काळात चाचणी करणाऱ्या देशांनी ६०० मेगॅटन वजनाचे अणुस्फोट केले. या स्फोटांमुळे एक कोटी साठ लक्ष लोक अकाली मरणार आहेत व एक कोटी साठ लक्ष अजात बालकांना इजा होणार आहे. फ्रान्स व चीनने अणुस्फोट चालू ठेवले तर याहूनही अधिक धोका निर्माण होईल.

म्हणून युद्धाकडे संपूर्णपणे पाठ फिरविणे हाच मानवी संस्कृती वाचविण्याचा एकमेव उपाय आहे. त्यासाठी निरनिराळ्या देशांत चाललेली शस्त्रास्त्रांची चढाओढ थांबली पाहिजे. केवळ अणुशस्त्रांच्या भीतीपासून मुक्त असे प्रदेश निर्माण करून भागणार नाही. तर कुठलीही आधुनिक आयुधे जेथे वापरली जाणार नाहीत, असे प्रदेश निर्माण झाले पाहिजेत. कोरिया, सुएझ आणि व्हिएटनाम या तीन उदाहरणांनी सिद्ध केले आहे की लष्करी बळाच्या जोरावर संघर्ष मिटविण्याची पद्धत आता जुनी झाली आहे. अमेरिकेने व्हिएटनाममधल्या सर्व लोकांना अणुशस्त्रे वापरून ठार मारले तर अमेरिका युद्ध जिंकेल. पण प्रत्यक्षात कोरियन युद्धाप्रमाणेच हेही युद्ध सबळ राष्ट्राला जय न मिळताच संपणार आहे.

देशादेशांत चाललेल्या सीमासंघर्षात निःपक्षपाती मध्यस्थी करण्याची युनायटेड नेशन्सने हमी दिली तर सीमासंघर्षातून युद्ध उद्भवणार नाही. जागतिक शांततेची जोपासना करण्याचा आणखी एक मार्ग म्हणजे ज्या अर्थी हुकूमशाही व जाचक राज्यकर्त्याविरुद्ध होणाऱ्या क्रांतीची आंतरराष्ट्रीय युद्धाच्या वणव्यात परिणती होऊ शकते, त्या अर्थी एखाद्या देशातले सरकार हुकूमशाही वृत्तीचे असेल तर तेथील जनतेला ते शांततापूर्ण मार्गाने उलथून पाडता येईल, अशी व्यवस्था पाहिजे. अशा व्यवस्थेचा एक मार्ग म्हणजे जगातल्या प्रत्येक देशात दर दहा वर्षांनी आंतरराष्ट्रीय देखरेखीखाली खास निवडणुका घेण्यात याव्यात. अर्थात् अशा निवडणुकीपूर्वी ती हवी की नको, यावर जगातल्या सर्व देशांच्या लोकांचे सार्वमत घ्यावे लागेल. ●

# खुणा, घोषणा आणि मतदार




◄◄ अन्न
(तूर्त तरी अुंचच!)




वस्त्र ▲
(बॅनर्सचे काम संपल्यावर)



◄◄ निवारा
(निदान अेवढा तरी!)

जनतेच्या सर्वांगिण विकासाची भरघोस आश्वासने सर्वच पक्षांकडून दिली जात आहेत. पण सर्वसामान्य मतदाराला आज हे पक्ष, त्यांच्या खुणा आणि घोषणा कशा दिसतात !



# निवडणूक

## एक पाहणी

पाच वर्षांची चौथी पर्वणी आता आली आहे, आणि निवडणुकीच्या प्रचाराने वातावरण दुमदुमून गेले आहे. सत्ताधारी, मत्ताधारी आणि लत्ताधारी अशा सर्वच पक्षांनी मतदारांच्यापुढे पदर पसरले आहेत. वर्षभर पराण्या टोचून, शेपट्या पिरगाळून कामाच्या ओझ्याखाली गाडून टाकलेल्या बैलांना पोळ्याच्या दिवशी पुरणपोळी खाऊ घालावी, त्याप्रमाणे मागची निवडणूक झाल्यापासून अरेरावीपुरताच संबंध असणाऱ्या सामान्य माणसाचा पुळका अचानकच सर्वांना आला आहे. बेत शिजत आहेत. प्रचारसभा गाजू लागल्या आहेत. हजारोंच्या सभेतील व्यासपीठावर मोठमोठ्या डरकाळ्या (आणि क्वचित सभेतल्यांची डोकी) फुटत आहेत. यावत्-चंद्रदिवाकरौ, झालाच पाहिजे, जनमताचा कौल, जनताजनार्दन यांसारख्या जुन्या शब्दांना नव्याने झिलई मिळू लागली आहे. कुणाकुणाचे हात बळकट करण्याचे, कुणाकुणाचा आवाज उठविण्याचे प्रयत्न चालू आहेत. काही ठिकाणी समाजोपयोगी कामे एकदम अंगात आल्यासारखी धडाक्याने चालू झाली आहेत; तर काही ठिकाणी चांगल्या चाललेल्या कामांना मुद्दाम खीळ घातली जात आहे. पाच वर्षे बेकार हिंडणारे गुंड, दादा लोक आनंदाने हरखून गेले आहेत. 'सुपाऱ्यां' चे दर ठरवीत आहेत. कुजकी अंडी, सडके टोमॅटो, सोडावॉटरच्या बाटल्या, फाटक्या चपला यांचे भाव तेजीत आहेत. भरपूर पोकळ आश्वासनांच्या याद्या सुरु झाल्या आहेत. प्रति-दिवशी वाढत आहेत. प्रत्येक पक्ष निवडून आल्यावर आपल्यासकट देशाचे भले कसे होईल याची बहारदार चित्रे रंगविली जाऊ लागली आहेत. उमेदवारांच्या कुंडल्याही बाजारात आल्या आहेत. सायन पद्धतीने, अक्षर पद्धतीने गुणागुणांची बेरीज करून ज्योतिष्यांचा काथ्याकूट सुरू झाला आहे. एक नवे वारे सर्वत्र खेळू लागले आहे.

सामान्य माणूस मात्र या साऱ्या गोंधळाकडे बऱ्याचशा अलिप्ततेने आणि काहीशा

# राजकारण आणि सामान्य मतदार निवडणूक

*निवडणुकींच्या निमित्ताने अनेक प्रकारच्या 'पाहण्या' करण्यात आल्या. मतदारांची चाचपणी करण्यात आली. अशाच एका पाहणीतील निरीक्षकांशी चर्चा करून एका अभ्यासकाने काढलेले निष्कर्षः*—**संपादक**

वैतागानेच पाहत असलेला दिसतो. तीन निवडणुकांच्या अनुभवाने सामान्य माणूस थोडासा अनुभवी बनलेला आहे. दाखवायचे दात आणि खायचे दात यांच्यांतला फरक आता त्याला ओळखता येऊ लागला आहे. "कामापुरता कुणी कुणाचा, अखेर जो तो पोटाचा" हे सत्य त्याला समजू लागले आहे. भाबड्या उत्साहाचे पहिले वारे संपले आहे. आता पाय जमिनीवर टेकले आहेत. हवेत उडणाऱ्यांचे खरे रूप त्यामुळे पाहता येऊ लागले आहे.

## जीवनकलहात बुडालेला अशिक्षित

पुण्यापुरतेच बोलावयाचे झाले, तर शिक्षित, अर्धशिक्षित आणि अशिक्षित असे असे मतदारांचे तीन विभाग करता येतील. संपूर्ण अशिक्षित मतदारांची दृष्टी एका ठराविक वर्तुळातच फिरत राहते. तिची कक्षा विस्तारत नाही. सर्व उमेदवारांची नावेही त्यांना माहिती नसतात. वारंवार कानांवर पडलेली एक-दोन नावेच त्यांच्या ध्यानात राहतात. परंतु नावांचे त्यांना काही महत्त्वच नसते. त्यातले काहीजण असे असतात, की बैलांच्या जोडीला मत द्यायचे त्यांनी कायम ठरवूनच टाकलेले असते. त्याची कारणमीमांसा शोधण्याची त्यांना गरज भासत नाही. त्यांना आपली ती सवयच झालेली असते. काँग्रेसच्या राजवटीमुळे बरे दिवस आले

१ ९ ६ ७

असे त्यांना मनापासून वाटत नाही. पण तरीही बैलाच्या जोडीला मत न देण्याचा विचारच त्यांच्या डोक्यात येत नाही. विधानसभा, प्रतिनिधित्व, लोकशाही समाजवाद वगैरे शब्दांचा अर्थही त्यांना माहीत नसतो. पण 'भारतमाता' या शब्दाची विलक्षण पकड त्यांच्या मनावर असते-आणि काँग्रेसला मत देणे म्हणजे भारतमातेसाठी काहीतरी करणे अशी त्यांची श्रद्धा असते. याच वर्गातल्या आणखी काही मतदारांच्या मनांमध्ये तर सतत अस्थिर वातावरणच असते. काँग्रेसच्या बैलजोडीची मिरवणूक पाहिली, गांधी-नेहरूंचे नाव ऐकले की त्यांच्यावर छाप पडते, आणि आचार्य अत्र्यांसारख्या वक्त्याचे भडक व्याख्यान ऐकले की काँग्रेसविरुद्ध लागलीच त्यांचे मत प्रक्षुब्ध होते. अभद्र शिव्या मोजण्यापर्यंत त्यांची मजल जाते. सारासार विचार करणे ही गोष्टच त्यांना माहिती नसते. कुणाच्याही भडक भाषणाने ते प्रभावीत होतात; अर्थातच त्यांच्यापैकी जे लोक कामगार-जगतात आहेत ते कुणाची कसली भाषणे ऐकून प्रभावित होत असतील हे सहज लक्षात येण्यासारखे आहे.

याचे एकमेव कारण असे की, या प्रकारच्या लोकांना रोजच्या जीवन-झगडयासाठीच इतकी शक्ती खर्च करावी लागते, आणि त्यातच इतके असमाधान त्यांच्या पदरी पडते, की इतरत्र दृष्टी वळविण्यास त्यांची प्रवृत्तीच होत नाही. सततच्या असंतुष्टपणामुळे त्यांनी मने कमालीची संवेदनाशील झालेली असतात. त्यामुळे "कुणीही निवडून येईना, आपल्याला तो खायला भाकरी थोडीच आणून देणार आहे ?" अशा बेफिकिर वृत्तीच्या पायावर पैसे घेऊन मत देण्यापर्यंत त्यांची मजल जाते. सगळयाच बाजूंनी आकसून गेलेल्या त्यांच्या जीवनानुभवामुळे त्यांचा असंतोष जरी मोठा असला, तरी अपेक्षा कमालीच्या मर्यादित असतात; आणि ही त्यांची नाडी बरोबर ओळखणाऱ्या चतुर 'वैदूं' ची अर्थातच वाण नसते.

देशापुढील बिकट समस्या, राजकारणाचे वारे, फार काय ज्याच्याविषयी सारे नेते उच्चरवाने कंठशोष करीत आहेत तो अन्यायमूलक सीमावाद याविषयी कशाचाही विचार करण्याचा उत्साह वरील अशिक्षित मतदारांमध्ये अजिबात नसतो. या गोष्टींची त्यांच्याशी चर्चा करून त्या त्यांना समजावून देण्याचा कुणी प्रयत्न केलाच, तर ते वरवर एकून घतील; आणि त्याची पाठ वळताच उपहासाने टवाळी सुरू करतील. कुठल्याही गोष्टीवर स्वतःचे मत बनविण्याची त्यांना इच्छा नसते. सवय नसते.

अर्थात हे सर्व विवेचन संपूर्ण अशिक्षित, लिहिता-वाचता न येणाऱ्या, जीवनकलहात हरवलेल्या गरीब सामान्य माणसासंबंधी आहे. साक्षरतेचे प्रमाण झपाटयाने वाढत असल्याने अशा मतदारांची संख्या उत्तरोत्तर कमी होत आहे हे खरे; पण सध्या भारताच्या भाग्यविधात्यांमध्ये अशा लोकांची टक्केवारी आहे, हे आपण विसरू शकत नाही.

## अर्धशिक्षितांना प्रिय असलेली ' आपली माणसे '

पुण्याच्या कामगारवर्गात आणि लहानसहान नोकऱ्या करणाऱ्यांमध्ये अर्धशिक्षितांचेच प्रमाण सर्वांत जास्त आहे. प्राथमिक ३–५ इयत्ता शिकलेले किंवा फारतर फायनलपर्यंत मजल गेलेले लोक या वर्गात आहेत. असं दिसतं की, संपूर्ण अशिक्षित लोकांप्रमाणे हे अर्धशिक्षित राजकारणाविषयी पूर्णतया उदासीन नसतात. ' मला काय कळतंय् राजकारणातलं ?' असे म्हणता म्हणता भोवताली घडणाऱ्या अनेकविध घटनांचे पडसाद त्यांच्या मनामध्ये उमटत असतात. नकळत प्रतिक्रिया बनत असतात. चांगले काय, वाईट काय, योग्य काय, अयोग्य कसा, याचा मनातल्या मनात आपोआप कौल लागत असतो. कित्येकदा या लोकांना पक्षांची माहिती नसते. प्रजा-समाजवादी आणि संयुक्त समाजवादी यांच्यांतला नेमका फरक त्यांना सांगता येत नाही. डावे आणि उजवे कम्युनिस्ट म्हणजे काय, याची त्यांना कल्पना नसते. पण त्यांना व्यक्ती ठाऊक असतात. कित्येक कार्यकर्ते त्यांच्यापर्यंत पोचलेले असतात. एस्. एम्. ची थोरवी हे लोक जाणतात. वडके, म्हाळगी, तेलंग यांचे कार्य त्यांना ठाऊक असते. कित्येकांशी त्यांचा साक्षात परिचय असतो. त्यांच्या व्यक्तित्वाची छाप त्यांच्या मनावर असते. शिवाय या ना त्या निमित्ताने हे कार्यकर्ते त्यांच्या स्वतःच्या—वैयक्तिक किंवा व्यावसायिक—उपयोगी पडलेले असतात. कुणाच्या दुकानच्या खटल्यांमध्ये, कुणाच्या धंद्यावरील सरकारी अन्यायाची दाद लावून घेण्यासाठी, कुणाला शिफारसपत्र देऊन नोकरी लावून देण्यासाठी कार्यकर्त्यांचा उपयोग झालेला असतो. त्यामुळे कित्येकदा विचित्र प्रकारचे विचारबंध यांच्या अपक्व मनात रुजलेले आढळतात. कित्येकांना पक्ष म्हणून काँग्रेसचा तिटकारा येतो, काँग्रेसने देशाचे वाटोळे केले असे ते म्हणून जातात. पण काही काँग्रेस कार्यकर्त्यांची नावे घेतली की त्यांच्या माना नंदीबैलाप्रमाणे हलू लागतात. त्या पुढाऱ्यांनी त्यांची कामे केलेली असतात. त्यांच्या दृष्टीने ती ' आपली माणसे ' असतात. कधीकधी याउलटही परिस्थिती असते. काँग्रेसवर आंधळा विश्वास असतो; पण एस्. एम्. ला किंवा अन्य एखाद्या परिचित कार्यकर्त्याला मत द्यायचे नाही, हे काही पटत नाही. आणि तसा त्यांचा आग्रहही नसतो. पक्षापेक्षा व्यक्तीला ते अधिक मानतात. पक्षाचा एकसंध विचार करू लागल्यावर त्या पक्षातील दोष आणि उणिवा त्यांना प्रथम दिसतात; आणि व्यक्तीचा विचार केला, तर तिचे गुण अधिक दिसतात.

## सुशिक्षित आणि उच्चशिक्षित

यापेक्षा वरचा वर्ग जो शिक्षणाच्या दृष्टीने धरता येईल, तो म्हणजे ज्या वर्गाला सामान्यपणे ' सुशिक्षित ' ही संज्ञा आपण लावू शकू. त्या वर्गातील सामान्य मतदारांची स्थिती फारच शोचनीय आहे. एक प्रकारच्या विफलतेने, औदासीन्याने

त्यांना इतके ग्रासलेले आहे, की हे लोक मतदान करतील ते केवळ सवय म्हणूनच किंवा एक कर्तव्य पार पाडावयाचे म्हणूनच. एरवी त्यांना मतदान करण्याविषयी काहीही उत्साह राहिलेला नाही. जेवढे राजकारण त्यांना समजते त्या क्षेत्रात आणि दैनंदिन परिचयाच्या सामाजिक क्षेत्रात सर्वत्र जी अंदाधुंदी, भ्रष्टाचार आणि अकर्तृत्व त्यांना दिसत आहे, त्याचा हा अपरिहार्य परिणाम आहे. अन्नधान्याचा बिकट प्रश्न आणि महागाईचा भस्मासुर त्यांना दिसतो; पण या समस्या दूर करण्याचे सामर्थ्य अमुक एका पक्षात आहे असा त्यांना कोणाविषयीही विश्वास वाटत नाही. काही निष्ठावान कार्यकर्त्यांची थोरवी ते जाणतात; पण असे एकटेदुकटे कार्यकर्ते काय करू शकणार असे त्यांना वाटत राहते. पक्षोपपक्षांनी दिलेल्या भरघोस आश्वासनांतील पोकळपणा त्यांना जाणवलेला असतो. त्यावर त्यांचा अर्थातच विश्वास नसतो. कॉंग्रेसमुळे देशाला बरे दिवस आले असे त्यांना वाटत नाही. पण विरोधी पक्षांच्या हाती सत्ता गेली तरी फारसा फरक पडेल असा विश्वासही त्यांना नाही त्यामुळे 'आहे हेच चालू द्या झालं' या निष्क्रिय वृत्तीने कॉंग्रेसच्या पेटीत मत टाकण्याची शक्यता याच वर्गातील लोकांमध्ये विशेष आहे. अर्थात हे कॉंग्रेसप्रेम नसून स्थितिप्रियता, बदल घडवून आणण्याची अनास्था हे त्याचे कारण आहे. कॉंग्रेसच्या मात्र ते पथ्यावर पडेल यात शंका नाही. अर्थात मतदानच न करण्याइतकी स्थितिप्रियतेचीं मजल गेली नाही तरच.

अत्यंत थोड्या प्रमाणात आढळणाऱ्या उच्च शिक्षित वर्गात ही अनास्था नाही. परंतु या मंडळींचे ठाम पूर्वग्रह बनलेले आहेत. त्यामुळे विवक्षित पक्षांकडे त्यांची मते झुकतात. " कॉंग्रेसमध्ये भ्रष्टाचार आणि अनीती बोकाळली असली तरी ' ताज्या रक्ता 'चे तरुण कार्यकर्ते निवडून आल्यावर कॉंग्रेसमध्ये आपोआप सुधारणा होईल आणि पूर्वीचे तत्त्वनिष्ठेचे वैभव तिला प्राप्त होईल, " अशी आशा करणारे याच वर्गात आहेत. " कुठलाच पक्ष सर्वांगपरिपूर्ण नाही, मग दोषयुक्त कॉंग्रेस स्वीकारण्यापेक्षा दोषयुक्त जनसंघ काय वाईट आहे, त्यात सुधारणा केली म्हणजे झाले," असा आग्रह धरणारे याच वर्गात आढळतात. आणि " आपल्याला बुवा स्वतंत्र पक्ष ठीक वाटतो. कम्युनिस्टांपासून वाचावयाचे असेल तर स्वतंत्र पक्षाच्या मागे गेले पाहिजे, " असे आवर्जून सांगणारेही या वर्गात आहेत. फार काय " भारतात कम्युनिझम आल्याशिवाय खरी प्रगती होणे शक्य नाही, " असे ठामपणे सांगणारेही कामगारवर्गापेक्षा उच्च शिक्षितच जास्त आढळतात. या लोकांना मूलगामी विचार करण्याची आवड असते. मात्र बऱ्याच वेळा हा विचार एकांगी दृष्टिकोनातून केला जातो. एकमार्गी मुद्यांचे चर्वितचर्वण होते, आणि विचारपूर्वक अविचार करण्याकडे ही मंडळी येतात. ज्या पक्षाचा ते हिरीरीने पुरस्कार करतात, त्या पक्षाचे खरे स्वरूप अर्थातच त्यांना कळलेले नसते. ते मूलतः जाणून न घेताच समजल्याचे समाधान त्यांच्या मनात असते. दुसऱ्याला ते पटवून देण्याचा आग्रहही त्यांच्यापाशी असतो.

विरुद्ध बाजूचे म्हणणे ऐकून न घेताच त्याचे खंडन करण्याची घाई त्यांना झालेली असतेच आणि जरी विरुद्ध बाजूचे एकदोन मुद्दे त्यांना पटलेच, तरी आपल्या भूमिकेत आणि पक्षपसंतीत फरक करण्याची त्यांची प्रवृत्ती होत नाही.

## स्त्रियांचा अविकसित वर्ग

अशा तऱ्हेने अशिक्षितांपासून उच्च शिक्षितांपर्यंत सामान्य मतदारांची निवडणुकीविषयी वेगळीवेगळी धारणा दिसून येते. मतदारांची बौद्धिक पात्रता लक्षात यावी म्हणून हे अशा प्रकारचे वर्गीकरण केले. यांमध्येही अनेक फरक आणि भेद आढळून येतील. मतभिन्नता दिसेल. स्त्रियांच्या बाबतीत असे आढळून येईल की, कामगारवर्गातील मोलमजुरी करणाऱ्या स्त्रियांच्या मनात निदान प्रचलित राज्ययंत्रणेविषयी आत्यंतिक चीड किंवा पराकाष्ठेची आपुलकी यांसारख्या ऐकांतिक भावना तरी आहेत. मग ती चीड घासलेट महाग झाल्याबद्दल असो, किंवा ती आपुलकी फलाण्या शेटने मत देण्याबद्दल पैसे दिले म्हणून असो. कुठलीतरी भावना त्यांच्यांत निश्चित असते. निवडणुकीचे वारे त्यांच्यात भिनलेले असते. याच्या अगदी उलट अनुभव पांढरपेशा स्त्रियांचे बाबतीत येतो. इंदिरा गांधी या एक स्त्रीच असल्याने आपणही तितक्याच थोर आहोत असे यांना उगीचच वाटत असते. आपल्याला राजकारण कळते अशी त्यांची समजूत असते. स्वतंत्र बुद्धीने विचार केल्याचा आव त्या आणतात. परंतु बहुतेक वेळा हे विचार त्यांच्या आसपासच्या लोकांकडून ऐकलेले किंवा वृत्तपत्रांत वाचलेलेच असतात. ते त्यांना नीट पेलतही नाहीत. राजकीय विचारांच्या दृष्टीने संपूर्ण अविकसित असाच गट महाराष्ट्रातील पांढरपेशा स्त्रिया निर्माण करतात, असे नाइलाजाने म्हणावे लागते. मात्र उच्च शिक्षण घेऊन स्वतंत्रपणे नोकरी करणाऱ्या काही स्त्रिया आपली वैचारिक पातळी टिकवून राहिलेल्या आहेत, हेही खरेच आहे. पण तुलनेने पाहता असा वर्ग फार थोडा.

जातीय पातळीवरून विचार केल्यास असे आढळेल की जातीयता उघडपणे कबूल करावयास आता लाज वाटत असली तरी सामान्य माणसाच्या मनाचा एखादा अंधारा कोपरा अजून तिने व्यापलेला आहे. ब्राह्मण-जनसंघ, हरिजन-रिपब्लिकन, मराठा-काँग्रेस अशा जातीय भूमिकेवरील जोड्या क्वचित सकारण, पण बऱ्याच वेळा अकारणच सामान्यांच्या मनात पक्क्या रुजलेल्या आढळतात. वरवर नाही म्हटले तरी नकळत यानुसारच त्यांचा मतनिर्णय घडू पाहत असतो. आपल्या देशाला मिळालेला हा शाप म्हणावयास हरकत नाही. परंतु शेवटी निष्कर्ष असाच काढावा लागेल की सामान्य मतदाराला राजकारण आणि निवडणुका यांविषयी फारसा उत्साह आता राहिलेला नाही. **आपला मतदानाचा हक्क बजावण्याविषयी तो जागरूक आहे, पण त्याचा विशेष उपयोग होईल असे वाटत नाही.**

१८ फेब्रुवारी १९६७

कोणत्याच पक्षाविषयी सामान्य माणसाला आज खरा विश्वास वाटत नाही. नाही म्हणावयास जनसंघाने थोडीशी आशा निर्माण केली आहे; पण त्यांना अजून पुष्कळ पुढे जायचे आहे. पक्ष म्हणून सामान्य मतदारांच्या मनात जर काही भावना असतील तर त्या जनसंघाविषयीच आहेत. बाकी साऱ्या पक्षांचे बाबतीत नेत्यांची पुण्याईच त्यांच्या पाठीशी उभी आहे. आणि तसे पाहिले, तर सामान्य माणसाच्या सुखदु:खांना हात घालील असा कार्यक्रमही कोणत्या पक्षाजवळ नाही. आज सामान्य माणसाला गरज आहे ती भाकरीची. जीवनोपयोगी वस्तूंच्या सुलभ प्राप्तीची. ही गरज तातडीने भागवील असा कार्यक्रम त्याला कोणत्या पक्षात दिसत नाही. प्रत्येक पक्षातले (बोटांवर मोजण्याइतके) काही नेते मात्र सामान्यांच्या कळकळीने भारलेले आहेत. त्यांच्या मागून तो जातो.

## समर्थ हुकूमशहाच्या शोधात !

किंबहुना सामान्य माणसाला मनातून लोकशाहीचाच हळूहळू उबग येऊ लागला आहे. केवळ, विशिष्ट 'लोकां'ना 'शाही' इतमामाने राहू देणारी 'लोकशाही' असण्यापेक्षा एखाद्या चांगल्या हुकूमशहाच्या हाती सत्ता गेल्यास तो देशाची त्वरित आणि सर्वांगीण प्रगती घडवून आणील, असा त्यांना भरंवसा वाटतो. अज्ञानाने गांजलेल्या आणि दारिद्र्याशी झगडणाऱ्या दुर्बल भारताला लोकशाही आत्मसात करायला अजून बरीच वर्षे घालवावी लागतील, असे त्यांना वाटते. विविध पक्षांची गर्दी पाहून सामान्य माणूस भांबावून जातो. एक सत्ताधारी पक्ष आणि एकच विरोधी पक्ष असावा किंवा एकाच व्यक्तीकडे सारी सत्ता केंद्रित व्हावी असे त्याला मनापासून वाटते.

आज सत्ताधारी पक्षाने देशाची जी परिस्थिती बनविली आहे ती कुणालाच समाधानकारक नाही. स्वातंत्र्य मिळून इतकी वर्षे झाली तरी अजून आपले अन्न आपल्या हातात नाही, भाषावार प्रांतरचनेचा प्रयोग पूर्ण फसलेला असून त्यामुळे भांडणे नि कटकटी मात्र वाढल्या आहेत, प्रांताप्रांतांतील भांडण-कुरबुरींवर केंद्राचे नियंत्रण नाही, दारूबंदीसारखी गोष्ट बूमरँगप्रमाणे उलटली आहे, सुवर्णनियंत्रण जाचक ठरले, शासनात लाचलुचपत आणि भ्रष्टाचार यांचे थैमान माजले, या सर्व गोष्टी थोडाफार विचार करणाऱ्या सामान्य माणसाला जाणवतात. त्यांची कारण-परंपरा त्याने समजावून घेतली नाही, तरी त्यांचे स्वरूप त्याला जाणवते. रुपयाचे अवमूल्यन म्हणजे नेमके काय ते त्याला सांगता आले नाही तरी त्याचे चटके रोजच्या जीवनात त्याला अनुभवावे लागतात. तो वैतागतो. त्रस्त होतो. त्यातून त्याला मार्ग मात्र सुचत नाही. कुणी मार्ग काढून दाखवील असेही त्याला वाटत नाही.

निवडणुका आणि राजकारण यांतील सामान्य माणसाच्या मनाचा आलेख हा असा आहे. त्याला निश्चित परिमाणेच नाहीत सारी केवळ गुंतागुंत आहे. अंदा-

धुंदीच्या राजकीय परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर आजचा सामान्य मतदार भांबावून गेला आहे. त्याची अन्नाची गरज भागविणाऱ्या, सर्व दृष्टींनी देशाला स्वावलंबी आणि स्वयंपूर्ण करणाऱ्या पक्षाच्या शोधात तो आहे. निदान अशी एखादी खंबीर व्यक्ती आपल्या साहाय्याला धावून यावी, मग तो हुकूमशहा बनला तरी चालेल, त्यामुळे तरी देशाला शिस्त लागू द्या. कोणाच्याही कोंवडयाने एकदाचे उजाडू द्या, असे तो स्वत:शीच पुटपुटत आहे. निवडणुकीचा निकाल काहीही लागो, सामान्य माणसाच्या या आवाहनाला प्रतिसाद देण्यासाठी कोण कशा रीतीने पुढे सरसावतो हेच आता पाहावयाचे. नाहीतर एकमेकांसाठी राजकीय पक्षांनी तयार केलेल्या 'सहा बाय अडीच'च्या खड्डयात शेवटी सामान्य माणूसच वैतागाने उडी घेईल किंवा लोकशाहीलाच संतापाने आपल्याबरोबर ओढील. ●


"डायमंड"

टॅक्सी व रिक्षा मीटर्स

भारतात सर्वप्रथम

डायमंड क्लॉक मॅन्यु. कं. प्रा. लि.,

११८० बुधवार पेठ, पुणे २.

डायमंड वॉच कंपनी

११७९ बुधवार पेठ, पुणे २.

महाराष्ट्रातील ख्यातनाम घडयाळजी. सर्व प्रकारची घडयाळे व इन्स्ट्रूमेंटस् चोख दुरुस्त केली जातात.

# एक संवाद

## कसं काय पाव्हणं बरं हाय का ?

[ आडगावच्या एका फाट्यावर दोन्ही बाजूंना ध्वज लावलेली जीप गाडी गच्कन थांबते. गाडीतल्या दोन-चार प्रचारकांचे आंबलेले देह हिंदकळतात. फाट्यावरचा 'पाव्हणा' आपला स्थूल देह सावरीत जीपच्या माठीमागे अलखन् पालखन घालून स्थानापन्न होतो. प्रचारकांच्या गर्दीतून बाहेर तंबाखूची पिचकारी टाकून तोंड उघडतो... आणि जीप सुरू होते. ]

पाव्हणा : आवंदा लय टायम केला...

प्रचारक : जरा हे जीपच, जमत नव्हतं. गरीब माणसं आम्ही.

पाव्हणा : तेबी खरं हाये. इलेक्शान लढायचं म्हणजे तुमा आमा सारख्याचं ख्योळ कुटला बाबानू.

उमेदवार : कुणीतरी या सत्ताधाऱ्यांना येसन नको का घालायला ?

पाव्हणा : पायजेल की. आवंदाला बैलांना हिसका दावलाच पायजे. जन्तची पार दैना झालीया. पार रया गेली पघा. गेल्या सालाला जन्ता पार कावली. कार्डाव लाल जवारी मिळाय लागली तवा कुणाच्या कुणाच्या दोन टायमाला चुली चेतल्या.

प्रचारक : म्हणजे मिलो मिळायला लागल्यावर.

पाव्हणा : तवाच. तुमचं ते तालुक्यातलं लाल टोपीवालं हायतना...

प्रचारक : आमचे कुलकर्णी वकील म्हणा की !

पाव्हणा : त्योच बघा काय फर्डा बोलतुया पठ्ठ्या. असं जीव तुडून राबलं न् जन्तची हाक समद्यास्नी कानांवर घातली. तवा त्यानी नि आमच्या आडगावच्या पोरांनी मामदाराला पार जेर केला तवा ह्यो रस्ताबी झाला पघा. आता तुमी आमच्या गणू बामणाकडंच निघाला असाल.

उमेदवार : नाही. गणेश आता दिवटीचा प्रचार करतोय ना. आमची खूण खटारा आहे.

पाव्हणा : मंग तुमची ध्योट पंचायतीम्होरं लावा गाडी.

उमेदवार : भुजंगराव सरपंच असतील ना गावात ?

पाव्हणा : असंल की. त्ये बेनं भारी अवलादीचं. कालच्याला पांढऱ्या टोप्यांचा फड पडला होता वाड्यावर.

प्रचारक : मग भुजंग ‘ फुटला ’ म्हणा की ?

पाव्हणा : त्ये असं बघतया व्हय. बीएबी आलतं त्येच्या संग कालच्याला दोन कोंबड्यांची चटणी केलीस समद्यांनी साळंचं ठरतया जनू.

प्रचारक : केवड्याला ठरला सवदा ?

पाव्हणा : आमास्नी कुटलं कळाया त्ये; पर समद्यांचं म्हणणं हाय की आवंदाच्या इलेक्शनमंधी गावाला साळा झालीच पायजे.

प्रचारक : अहो, पण या सवदेवाजीनं देशाचे प्रश्न सुटणार कसे ? गरिबी आहे. म्हागाई आहे. भ्रष्टाचार आहे. लाचलुचपत आहे. काळा बाजार आहे.

पाव्हणा : मोप हाये. पर आमचंबी गाव हाय. गुर्जी हायती. पोरं हायती त्यासनी टाळक्यावं छप्पार नग व्हय ?

प्रचारक : पण तुम्ही आपली मतं विकली तर हे शासन उखडणार नाही. बंड होईल सगळीकडे.

पाव्हणा : अवं…खुळं हायसा तुमी. आमीबी आयडीया लडवलीया.

उमेदवार : कसली ?

पाव्हणा : समद्यांचा पैका घ्यायचा. म्हंजी मंग आपलं मत ‘ फ्रि ’ राहील की नाही ?

उमेदवार : राव, हे आमच्या डोक्यात आलंच नाही.

पाव्हणा : यील हळू हळू. त्येंच्यात गणू बामणाचा इरोध हृया धंद्यास्नी. पर त्येंचं नं तुमचं वाकडं. त्यो पणती म्हणतुया अन् तुमची गाडी. तुमी लाल टोपडं घालताया अन् त्यो पिवळी. आता अशानं टोप्यांचं राज्य जाणार हाय व्हय. खुळं हायसा झालं.

उमेदवार : मग आम्हांला काही चान्स नाही म्हणा की ?

पाव्हणा : तसं नव्हं राव. तुमी आमच्या भुजंग्याला गाठा. गावाचं ठरल तसं होईल.

उमेदवार : अहो, तुमची शाळा झाल्यावर कोण आम्हांला मते देणार ?

पाव्हणा : अवं कुठली साळा न् कुठचं काय…त्यो भुजंग्या आपलं जमवून घील. पैसं घालंल खिशात अन् गाव बोंबलत बसल. तुमी आपलं तवर गावाला चकरा मारा. आदल्या रातच्याला बी तुमचं जमल.

उमेदवार : हे मात्र लाखातलं बोललात. तुम्हीच आमची बाजू सावरायची.

पाव्हणा : आमी कुठं जातुया आता. मी पुण्याला जरा तांदुळ घालत असतो बामनांस्नी. तवा आता तुमची सर्व्हिस सुरू झाल्याली हायच. फाटयाव जरा लक्ष ठेवत जा.

(एवढ्यात आडगाव येते आणि पाव्हणा ‘ रामराम ’ म्हणत निघून जातो आणि उमेदवार एक शिवी हासडून पंचायतीकडे आपला मोर्चा वळवतो.)

**— एक प्रचारक**

□

# एक सिंहावलोकन

त्रि. ल. कुलकर्णी

येत्या दिनांक १५ ते २१ फेब्रुवारी या मुदतीत आपल्या देशातील सुमारे २४ कोटी नागरिक लोकशाहीतील सर्वांत मोलाचा असा आपला मतदानाचा अधिकार गाजवून देशासाठी आणि आपापल्या राज्यासाठी नवी सरकारे निवडून देतील. २ लक्ष ७० हजार मतदान केंद्रांवर मतदान होऊन लोकसभेसाठी ५२१ व सर्व राज्यांच्या विधानसभांसाठी मिळून ३,५६३ प्रतिनिधी निवडले जातील.

सभोवतालच्या अनेक आफ्रो-आशियाई राष्ट्रांतून लोकशाहीचे दीप एकामागून एक विझत चालले असताना भारतासारख्या खंडप्राय देशाने समुद्राच्या लाटांना आणि वाऱ्यावादळांना तोंड देत खंबीरपणे मार्गदर्शन करीत राहणाऱ्या दीपस्तंभासारखी आपली लोकशाही टिकवून ठेवली आहे हे नजरेत भरण्यासारखे आहे. लोकशाहीची खरी चाचणी सार्वत्रिक निवडणुकांत होते. भारतातील गेल्या तीनही सार्वत्रिक निवडणुका शांतपणे आणि व्यवस्थितरीत्या पार पडल्या. चौथ्या सार्वत्रिक निवडणुकीकडे साऱ्या जगाचे लक्ष लागले आहे.

भारतीय घटनेच्या ८१ व्या कलमानुसार आणि १७० व्या कलमानुसार अनुक्रमे लोकसभेच्या व घटकराज्यांच्या विधानसभांच्या निवडणुका होतात. संसदेच्या निवडणुकीसाठी उभ्या राहणाऱ्या उमेदवारांची पात्रता मर्यादित करण्याचे अधिकार घटनेच्या ८४ व्या कलमान्वये लोकसभेला दिलेले आहेत. पण लोकसभेने अद्याप त्या अधिकारांचा वापर केला नाही; तसेच घटनेप्रमाणे लोकसभा आणि विधानसभांसाठी अनुसूचित जाती-जमातींकरता खास मतदारसंघ १९७० पर्यंत राखून ठेवण्याची तरतूद आहे. परंतु बरेचसे हरिजन सामान्य मतदारसंघांतून निवडून येऊन आपणही इतरांच्या बरोबरीने पुढारलेले आहोत हे सिद्ध करण्याचा प्रयत्न करतात. ही प्रगतीची खूण आहे.

पहिली भारतव्यापी सार्वत्रिक निवडणूक २५ ऑक्टोबर १९५१ ते २१ फेब्रुवारी १९५२ अशी तब्बल चार महिने चालली. सारा अनुभवच नवा होता. १७ कोटी ३२ लाख मतदारांची मतदानव्यवस्था, त्यासाठी गोळा करावी लागणारी टाचण्यांपासून तो मांडवांपर्यंतची सामग्री, पक्षोपपक्षांचा उलटसुलट प्रचार, आपल्याला हवा तो उमेदवार निवडण्याची मतदारांची कसोटी आणि मतदारांकडे मते मागायला जाण्याची उमेदवारांची वेळ—सारेच नवीन होते. नवलाईचे होते.

[ पृष्ठ ५५ वर चालू ]



# आणि ड्रॅगन जागा झाला

**अरुण साधू**

## उत्तरार्ध

लेखांक : सातवा

शेन्सी प्रांतातील लाल सोव्हिएट म्हणजे खरोखरच एक आश्चर्य होते. ग्रामीण मध्ययुगीन साम्यवादाचे ते आदर्श उदाहरण होते. मार्क्सच्या तत्त्वज्ञानापेक्षा शेन्सी प्रांतातील लाल सेनेच्या प्राप्त परिस्थितीमुळे आणि आजूबाजूच्या भौगोलिक गरजांमुळेच हा साम्यवाद अंमलात आला होता. अर्थात सोव्हिएटचे नेते मार्क्सिस्ट विचाराचे होते. त्यांच्या विचारसरणीमुळे या सोव्हिएटच्या व्यवस्थेला तसे वळण मिळाले असले तरी त्यातही स्वाभाविकता होती. परिस्थितीचा वाटा त्यामध्ये फार मोठा होता.

आधीच सांगितल्याप्रमाणे शेन्सी प्रांतात, विशेषत: उत्तर भागात, नावापुरतेही औद्योगीकरण झाले नव्हते. शेती आणि कुरणे यांवरच या भागातील अर्थव्यवस्था आधारित होती. काही शहरांवर बाहेरच्या भागातील औद्योगीकरणाचा प्रभाव अर्धवटपणे जाणवून पडत होता. म्हणजे साधारणत: मध्ययुगीन संस्कृतीला साजेशी अशीच सांस्कृतिक आणि सामाजिक व आर्थिक व्यवस्था या भागात होती. अशा या भागात मार्क्सवादासारखे औद्योगीकरण झालेल्या समाजाला लागू पडतील असे आधुनिक अर्थविचार घेऊन कम्युनिस्ट उतरले होते. या विचारांच्या आधारावर त्यांना क्रांती घडवून आणायची होती.

परंतु प्राप्त परिस्थितीत, औद्योगीकरणाच्या अभावामळे आपले आधुनिक विचार बाजूला ठेवावे लागून परिस्थितीला तोंड देताना स्वत:च्या अशा नवनव्या पद्धती कम्युनिस्टांना वापराव्या लागल्या. शेतकऱ्यांचे प्रमुख प्रश्न, जमीनविषयक व

करविषयक प्रश्न सोडविण्यावरच त्यांनी भर दिला. शेन्सीमध्ये कम्युनिस्टांनी अत्यंत यशस्वीपणे अंमलात आणलेल्या आर्थिक सुधारणा म्हणजे जमिनीचे पुनर्वाटप, जमीनदारीचे निर्मूलन, सावकारीचे निर्मूलन आणि जबरदस्तीने करवसुली करण्याला बंदी.

जवळजवळ सगळा उत्तर प्रांत शेतकऱ्यांच्या वस्तीचा होता. सोव्हिएट म्हणजे शेतकऱ्यांचे, कामकऱ्यांचे राज्य. पण त्या अर्थाने शेन्सीमध्ये औद्योगिक कामकरी नव्हतेच. त्यामुळे सोव्हिएट शासनाने ग्रामीण लोकवस्तीचे पुढीलप्रमाणे वर्गीकरण केले होते. बडे जमीनदार, मध्यम आणि छोटे जमीनदार, श्रीमंत शेतकरी, मध्यम शेतकरी, गरीब शेतकरी, खंडकरी शेतकरी, ग्रामीण कामगार, कारागीर आणि धंदेवाईक कामगारांत शिक्षक, डॉक्टर, इंजिनियर, तंत्रज्ञ आणि इतर ग्रामीण बुद्धिवाद्यांचा समावेश होई. राजकीय आणि आर्थिक दृष्टिकोनातून ही वर्गवारी केली होती. सोव्हिएटच्या निवडणुकांमध्ये खंडकरी शेतकरी, ग्रामीण कामगार आणि कारागीर यांना अधिक प्रतिनिधित्व दिले जाई. 'सामान्यांची हुकूमशाही' निर्माण करण्यासाठी हा प्रयत्न होता. परंतु एक जमीनदार सोडले तर इतर बाबतीत ही वर्गवारी कृत्रिम होती. ती केवळ राजकीय सोयीसाठी करण्यात आली होती. मूलतः त्या भागात जमीनदार, सावकार आणि शेतकरी यांशिवाय दुसरे वर्गच नव्हते.

जिथे जिथे कम्युनिस्ट सत्ता स्थिर झाली होती तिथे तिथे या वर्गीकरणावर आधारलेले सोव्हिएट शासन व्यवस्थित रीतीने आपला कारभार हाकीत होते. सोव्हिएट शासनाची योजना चढत्या भांजणीन केलेली होती. 'ग्राम सोव्हिएट' ही सोव्हिएट शासनाची सगळ्यात छोटी संस्था, त्यावर जिल्हा सोव्हिएट, कौंटी सोव्हिएट, प्रांत सोव्हिएट आणि मध्यवर्ती सोव्हिएट. मध्यवर्ती सोव्हिएट ही शासनाची सर्वोच्च संस्था. प्रत्येक खेड्यातून वरपर्यंतच्या सर्व सोव्हिएटस्वर प्रतिनिधी निवडून दिले जात. सोळा वर्षे वयापासूनच्या सर्व व्यक्तींना मतदानाचा अधिकार होता.

प्रत्येक जिल्हा सोव्हिएटच्या अखत्यारात, वेगवेगळ्या खात्यांसाठी वेगळ्या समित्या नेमण्यात येत. त्यांपैकी क्रांतिकारी समितीकडे शासनाचे विशेष अधिकार असत. लाल सैन्याने एखाद्या जिल्ह्याचा कबजा घेतला की तिथे एखादी जाहीर सभा घेऊन तीमध्ये ही क्रांतिकारी समिती निवडली जाई. कम्युनिस्ट पक्षाशी या क्रांतिकारी समितीचा जवळचा संबंध असे. हीच समिती नंतर इतर समित्यांच्या निवडणुका घेई. जिल्हा सोव्हिएटच्या अधिकाराखाली शिक्षण, सहकार, लष्करी व राजकीय प्रशिक्षण, जमीन, आरोग्य, लोकप्रशिक्षण, क्रांतिकारी संरक्षण, लाल सेनेची वाढ, शेतीसाहाय्य, लष्करी शेती अशा विविध खात्यांसाठी समित्या नेमल्या जात. अशा समितीच्या साखळ्या वरच्या सर्वोच्च सोव्हिएटपर्यंत असत.

शासनाची अशी व्यवस्था लागत असताना कम्युनिस्ट पक्षाची संघटना स्वस्थ बसली नव्हती. शहरांतील आणि खेड्यांतील कामगारांमध्ये पक्षाचा जोरदार प्रचार चालूच

होता. पक्षाची सभासदसंख्या झपाट्याने वाढत होती. मुलांसाठी आणि स्त्रियांसाठी पक्षाने वेगवेगळ्या शाखा काढल्या होत्या. शेतीमंडळ, विकासमंडळ, जपानविरोधी मंडळ अशा विविध उपयुक्त संघटनाही राजकीय प्रचारक चालवीत. उत्तर शेन्सी प्रांतातील काही जुन्या गुप्त संघटनांची मने वळवून त्यांनाही या संघटनांत सामील करून घेऊन उपयुक्त कामे वाटून दिली गेली होती. स्वयंसेवकांचे संरक्षक दल तर प्रत्येक खेड्यात संघटित करण्यात आले होते.

या सर्व समित्या, मंडळे, संघटना यांच्या कारभाराचे एकसूत्रीकरण मध्यवर्ती सोव्हिएट सरकार हे कम्युनिस्ट पक्ष व लाल सेना यांच्यामार्फत करीत होते. संघटनेचे काम, निर्णय, सभासदनोंदणी आणि प्रत्यक्ष काम हे शेतकरी स्वत: लोकशाही पद्धतीने करीत असले तरी त्या कामावर कम्युनिस्ट कार्यकर्त्यांची देखरेख असायचीच. लोकसंख्येतील प्रत्येक स्त्री–पुरुष, मूल कोणत्या तरी संघटनेचे सभासद असलेच पाहिजे व त्यामुळे प्रत्येकावर कोणते तरी निश्चित काम सोपविले गेलेच पाहिजे यावर सोव्हिएट सरकारचा कटाक्ष असे.

## शेतकरीवर्गाशी संधान

या सर्व संघामध्ये आणि शासनामध्ये सोव्हिएट सरकारची भूमिका अतिशय व्यवहारी आणि बरीचशी उदार होती असे दिसून येते. सोव्हिएट सरकारला आपल्या क्षेत्रातील उत्पादन वाढवावयाचे होते. बरीचशी पडीक जमीन लागवडीखाली आणायची होती. जमीनदारांच्या ताब्यात असलेली पडीक जमीन शेतकरी कधीच कसत नसत. कारण त्यांना त्यापासून काहीच फायदा मिळत नसे. या पडीक जमिनी लागवडीस आणण्यास सोव्हिएट सरकारने उत्तेजन दिले. अधिक धान्योत्पादनाच्या मोहिमांमध्ये शेतकऱ्यावर बळजोरी होऊ नये याकडेही सोव्हिएट सरकार लक्ष ठेवून असे. शेतकऱ्यावर बळजोरी केल्याने कुठलेच प्रश्न सुटत नाहीत हे लाल सैन्याला अनुभवाने कळून चुकले होते. त्यामुळे अतिशय सावधगिरीने शेतकरी स्वयंस्फूर्तीने या मोहिमांमध्ये भाग घेतील अशा तऱ्हेने प्रचारक प्रचार करीत. ज्या बऱ्याच ठिकाणी पुरुष लाल सैन्यात भरती झाल्याने पुरुषांची संख्या घटलेली असे, त्या ठिकाणी स्त्रिया मोठ्या प्रमाणात शेतीकामात भाग घेत. अशा वेळी वृद्धांना, मुलांना कोणती कामे द्यावीत, जुन्या परंपरागत रीतीने आखूड पाय केलेल्या स्त्रियांना कोणती कामे द्यावीत, तरुण, मोठ्या पायाच्या स्त्रियांना कोणती कामे करायला सांगावीत यांविषयी अगदी वरपासून व्यावहारिक तपशीलवार सूचना येत.

सोव्हिएटच्या अधिक उत्पादनाच्या या सर्व चळवळींना शेतकऱ्यांचा पूर्ण पाठिंबा होता. याला कारण म्हणजे सोव्हिएटने जमीनविषयक कायद्यांत केलेल्या क्रांतिकारक सुधारणा. चीनमधील जमीनविषयक कायदे किती भयंकर होते, जीव घेणारे कर गरीब शेतकऱ्यांकडून जमीनदार कशा क्रूरपणे वसूल करीत आणि खूप पिकवूनही

शेतकऱ्यांच्या हाती दुष्काळाच्या वेळी दाणाही कसा उरत नसे याचे वर्णन आधी आलेच आहे. नवा प्रदेश ताब्यात आल्याबरोबर सोव्हिएट प्रथम जमीनदारी नष्ट करून जो कसेल त्याला जमीन देऊन टाकीत. शिवाय पिढयान् पिढया उत्पन्नाच्या दोनतृतीयांश कर भरून रंजीस आलेल्या शेतकऱ्यांना थोडासा दिलासा मिळण्यासाठी सोव्हिएटने एक वर्षाचा कर संपूर्ण माफ केला होता. आणि करमुक्तीचे पहिले वर्ष संपल्यावर धान्यविक्रीवर अगदी नाममात्र कर लावण्यात आला. शिवाय जे पळून गेलेले जमीनदार होते त्यांच्या जमिनी सोव्हिएटने गरीब शेतकऱ्यांत वाटून तर दिल्याच पण त्याचबरोबर श्रीमंत वर्गाजवळील जमिनी आणि इतर जनावरे यांचे समान वाटप करण्यात आले.

चिनी शेतकऱ्याला संघटनेचा, शिस्तीचा अतिशय कंटाळा असे मानले जात होते. पण आतापर्यंत शेतकरी अर्धपोटी राहून जमीनदारांसाठी खपत होता. सोव्हिएटने त्याला स्वत:साठी खपण्याची संधी दिली. त्यामुळे तो उत्साहाने सोव्हिएटच्या चळवळीत सामील होऊ लागला आणि म्हणूनच सोव्हिएट चळवळ शेतकऱ्यांत ग्रामीण भागांत लोकप्रिय होऊ लागली. तिची मुळे घट्ट होऊ लागली. किंबहुना सोव्हिएट चळवळ तेथील लोकसंख्येशी एकरूप होऊन गेली. इतकी की सोव्हिएट क्षेत्रातील खेडयापाडयांमध्ये संरक्षणासाठी अथवा पोलिसी बंदोबस्तासाठी लाल सैन्याच्या तुकडया ठेवल्या जात नसत. शेतकऱ्यांच्या संघटनाच हे काम करीत. लाल सैन्य किंवा सोव्हिएट सरकार हे उपरे आहे किंवा आपणांवर लादले गेले आहे असे स्थानिक जनतेला यत्किंचितही वाटू नये याची दक्षता घेतली जात असे. सोव्हिएट सरकार हे आपले सरकार आहे आणि लाल सैन्य हे आपले सैन्य आहे अशीच प्रबळ भावना तेथील लोकांत निर्माण केली जाई. आणि त्यामुळे लोक हिरीरीने संरक्षणाच्या, उत्पादनाच्या, बंदोबस्ताच्या कार्यक्रमामध्ये भाग घेत. लाल सैन्याला यामुळे शत्रुसैन्याशी लढण्यास अधिक मोकळीक मिळे.

## सामूहिक शेती

जमिनीच्या पुनर्वाटपाची पद्धत अगदी सोपी होती. श्रीमंत जमीनदारांजवळील सर्वच्या सर्व जमीन जप्त केली जात नसे. जमीनदार आणि त्याच्या घरातील इतर माणसे मिळून जेवढी म्हणून जमीन कसू शकतील तेवढी जमीन ठेवून बाकीची जमीन जप्त केली जाई. या जप्त केलेल्या जमिनीचे गरीब शेतकऱ्यांत पुनर्वाटप करताना समान प्रमाणांत पुनर्वाटप करण्याची पद्धत नव्हती. शेतकऱ्याचे एकूण कुटुंब केवढे, त्याची गरज किती आणि तो किती जमीन कसू शकेल याचा अगोदर अंदाज घेऊन मग जमीन दिली जाई. उत्तर शेन्सी प्रांतात जमीन भरपूर होती, त्यामुळे बहुतेक गरीब शेतकऱ्यांचे सोव्हिएट सरकारला समाधान करता आले. कर रद्द केल्याने मध्यवर्गीय शेतकऱ्यांचेही सोव्हिएटला दुवे मिळाले. काही काही ठिकाणी

पळून गेलेल्या जमीनदारांचीच जमीन एवढी पडली होती की त्या त्या ठिकाणच्या गरीब शेतकऱ्यांना त्यांच्या गरजेप्रमाणे वाटूनही ती उरली. त्यामुळे तेथे शिल्लक असलेल्या जमीनदारांना हातही लावण्याचे काम पडले नाही. असे बरेच जमीनदार पुढे कम्युनिस्ट पक्षात सामील झाले.

धान्योत्पादन वाढविण्यासाठी सरकारतर्फे कर्जाच्या रूपाने, उपकरणांच्या रूपाने बरीच मदत केली जाई. पडिक जमिनी लागवडीखाली आणणाऱ्या गरीब शेतकऱ्यांना बी-बियाणे आणि सोव्हिएट कारखान्यात नव्याने तयार झालेली उपकरणे पुरविली जात. शेतकी शिक्षणाची एक प्राथमिक शाळाही सोव्हिएट सरकारने चालविली होती.

सोव्हिएट सरकारने सहकारी चळवळीचीही कास धरली होती. सामूहिक मालकीच्या आणि लाल सैन्याच्या मालकीच्या जमिनीही लागवडीखाली आणल्या जात. आठवड्यातून एक दिवस मुलेबाळे, स्त्री–पुरुष, कामगार, शिक्षक, राजकीय प्रचारक, तंत्रज्ञ, डॉक्टर, जवळपास असलेले लाल सैनिक इत्यादी सर्व सामूहिक शेतीवर कामे करीत. माओ-त्से-तुंगदेखील या साप्ताहिक शेतकामात भाग घेत असे. चीनमध्ये पुढे मोठ्या प्रमाणात अंमलात आणण्याचा प्रयत्न झालेल्या सामूहिक शेतीचा पाया माओ-त्से-तुंगने अशा रीतीने प्रथम शेन्सी प्रांतात घातला होता.

## शेन्सीतील सामाजिक सुधारणा

शेतीसुधारणाबरोबरच सोव्हिएट सरकारने आपल्या क्षेत्रात जमतील तेवढ्या सामाजिक सुधारणा करण्यावरही भर दिला होता. बरीच वर्षे सोव्हिएट शासनाखाली राहिलेल्या भागातून या सुधारणा स्पष्ट दिसत होत्या आणि सोव्हिएटमध्ये नव्याने अंतर्भूत झालेल्या भागात त्याविषयी जोरदार प्रचार केला जात होता. चिनी शेतकऱ्यांचे अफू सेवनाचे अतिशय घातक व्यसन उत्तर शेन्सी प्रांतात सोव्हिएटच्या प्रयत्नाने जवळ जवळ सुटले होते. सोव्हिएटच्या शिस्तबद्ध शासनात भ्रष्टाचार जवळ जवळ नव्हताच. सोव्हिएटच्या सर्वोच्च अधिकाऱ्यांना सामान्य कामगारांएवढाच पगार आणि रेशन मिळत होते. प्रत्येक व्यक्तीला काम देण्याच्या धोरणामुळे बेकारी जवळ जवळ उरली नव्हती. भिकारीही शिल्लक नव्हते. लहान मुलींचे पाय लाकडी बुटांत बांधून ठेवण्याची दुष्ट चाल मोडून काढण्यात आली होती. नको असलेले मूल अर्भकावस्थेतच मारून टाकण्याची प्रथा गरीब शेतकऱ्यांत होती. ती कायद्याने बंद करण्यात आली. गुलामी पद्धत आणि वेश्याव्यवसाय बंद करण्यात आला. बहुपत्नित्वाची आणि बहुपतित्वाची चालही रद्द झाली.

सोव्हिएट सरकारने विवाहविषयक, घटस्फोटविषयक आणि वारसाविषयक कायद्यांमध्ये क्रांतिकारक बदल केले. स्त्रियांचा व्यापार बेकायदेशीर ठरविण्यात

आला. परस्परसंमतीशिवाय तरुण-तरुणींचा विवाह करण्यास बंदी घालण्यात आली आणि विवाहाचे वय मुलींसाठी १८ वर्षांचेवर आणि मुलांसाठी २१ च्या वर वाढविण्यात आले. जे स्त्री-पुरुष परस्परांच्या संमतीने बरोबर राहतील त्यांना पती-पत्नी म्हणून मान्यता देण्यात येई. परस्परसंमतीने घटस्फोट घेण्याचाही मार्ग कायद्याने सुकर झाला.

मोफत शिक्षणाची अत्यंत अभिनव पद्धती सोव्हिएट शासनाने अंमलात आणली. शिक्षण सर्वव्यापी असे आणि त्याचा मुख्य भर व्यावहारिक वाढीवर असे. काही कालखंडात शिक्षण घेऊन तयार झालेला मुलगा शेतकरी, लष्करी सैनिक किंवा कारागीर यांपैकी कोणतेही काम गरजेप्रमाणे करू शकत असे. चिनी लिपीमध्ये कम्युनिस्टांनी संपूर्ण सुधारणा घडवून आणली. पूर्वी हजारो अक्षरे अगोदर शिकावी लागत तेव्हा कुठे चिनी लिहिता वाचता येत असे. कम्युनिस्टांनी कमी अक्षरांची सोपी अशी एक सुधारलेली लिपी सोव्हिएट क्षेत्रात अंमलात आणली. त्यामुळे साध्या लाल सैनिकांनाही चिनी भाषा शिकणे सोपे जाऊ लागले. शिक्षणप्रसारावर कम्युनिस्टांचा बराच भर होता. अतिशय आकर्षक पद्धतीने, नाटके, छोटी प्रहसने, गाणी, घोषणा यांच्या मदतीने शिक्षण आणि राजकीय शिक्षण एकदमच देण्याची पद्धत होती. अर्थातच प्रौढांचा आणि मुलांचा अभ्यासक्रम वेगवेगळा होता.

हजारो वर्षे चीनमधील कायदे जमीनदारांच्या आणि सरकारी अधिकाऱ्यांच्या बाजूने असत. सामान्य लोकांविषयी त्या कायद्यामध्ये यत्किंचितही कदर नसे किंवा स्थानिक जमीनदार जसे वागतील तोच कायदा. शांटुंगमधील एका शेतकऱ्याच्या डुकराने तेथील जमीनदाराची कोंबडी मटकावली. कायदा जमीनदाराच्या हाती होता. त्याने ते डुक्कर मारून तर टाकलेच; पण त्याचबरोबर त्या शेतकऱ्याला दंड म्हणून त्याच्याकडे असलेली अर्धा एकर जमीन जप्त करून टाकली आणि तो शेतकरी भूमिहीन झाला अशा कायदेशीर जुलमाची कितीतरी उदाहरणे सापडतात.

सोव्हिएट सरकारने प्रथम हा मूर्खपणा बंद करवला आणि सारे कायदे लोकांच्या बाजूचे केले. न्यायदानाची क्रिया अतिशय साधी आणि सोपी करून टाकली. खटले कोर्टात नेण्याअगोदर भांडणे परस्पर समजुतीने अथवा लवादाच्या मध्यस्थीने सोडविण्यास उत्तेजन दिले जाऊ लागले. स्त्रियांना अधिक सवलतीची वागणूक दिली जाऊ लागली, युद्ध गुन्हेगारांनादेखील दयेने न्याय्य वागणूक मिळू लागली. हा सगळा मूलभूत बदल होता.

याच सुमाराला चीनच्या सर्वोच्च न्यायालयाचे एक न्यायमूर्ती चेन चिंगकुन हे पेकिंग सोडून पळून सोव्हिएट क्षेत्रात आले होते. सोव्हिएट क्षेत्रातील ' लोकशाही ' न्यायालयांची त्यांनी जवळून पाहणी केली आणि लिहून ठेवले की, " या न्यायालयांतील निवाडे अतिशय मूलभूत स्वरूपाचे, अगदी सोपे आणि जणू स्वर्गातून केल्यासारखे वाटतात. "

सुमारे चौदा कोटी लोकवस्तीच्या आणि इतर जगाशी युद्धाशिवाय दुसरे कोणतेच संबंध नसलेल्या या सोव्हिएटची अर्थव्यवस्थाही तेवढीच जिकिरीची होती. लाल सैन्याला धान्य, कपडा व शस्त्रास्त्रे पुरविणे आणि शेतकऱ्यांना दिलासा देणे ही सोव्हिएटची प्रमुख कामे होती. त्यावरच साऱ्या सोव्हिएटचे अस्तित्व अवलंबून होते.

## नव्या अर्थव्यवस्थेचा पाया

सोव्हिएटची अर्थव्यवस्था म्हणजे खाजगी भांडवलदारी, राष्ट्रीय भांडवलदारी आणि अगदी प्राथमिक समाजवाद यांचे एक विचित्र मिश्रण होते.

खाजगी उद्योगधंद्यांना आणि व्यापारांना मर्यादित स्वरूपात सोव्हिएटमध्ये परवानगी होती. त्यांना उत्तेजनही मिळत होते. उत्पादित मालाची खाजगी रीतीने वाहतूक करायलाही मुभा होती. त्याचबरोबर सोव्हिएट सरकारही खनिज तेल, इतर खनिजे यांच्या खाणी चालवून गुरेढोरे, मीठ, लोकर, कापड, कागद आदी कच्च्या मालाचा व्यापार करीत होते. फक्त या व्यापारामध्ये सोव्हिएट सरकारचा एकाधिकार नव्हता. खाजगी व्यापाऱ्यांच्या शर्यतीतच सोव्हिएट सरकार व्यापारात पडत असे. अर्थव्यवस्थेची तिसरी फळी सरकारी संस्थांच्या रूपाने उभारली गेली होती. सरकार आणि लोक या संस्थेमध्ये भाग घेत असत आणि व्यापाराच्या, उत्पादनाच्या बाबतीत या संस्था खाजगी व सरकारी व्यापाराशी स्पर्धा करीत, "खाजगी भांडवलशाहीचा नाश करून नवीन अर्थव्यवस्था निर्माण करण्यासाठी" या सहकारी संस्था उभारण्यात आल्या होत्या. आणि "व्यापाऱ्यांकडून जनतेची होणारी पिळवणूक थांबवणे, शत्रूने घातलेल्या नाकेबंदीला तोंड देणे, सोव्हिएट क्षेत्रांची अर्थव्यवस्था सुधारणे, जनतेची आर्थिक व राजकीय पातळी उंचावणे आणि समाजवादासाठी आदर्श तयारी करणे," अशी या सहकारी संस्थांची ध्येये होती.

अशा रीतीने खाजगी भांडवलशाही, सरकारी पातळीवरील भांडवलशाही आणि सहकारी व्यापार अशा परस्परविरोधी आर्थिक संस्थांची सोव्हिएट क्षेत्रामध्ये मोठी विचित्र गुंफण झाली होती. आर्थिकदृष्ट्या सुधारलेल्या भागात अशी अर्थव्यवस्था मोठीच गैरसोयीची आणि हानिकारक ठरली असती. पण या लाल क्षेत्रात या संस्था एकमेकांना पूरकच ठरत होत्या.

सबंध सोव्हिएट क्षेत्रात सोव्हिएट सरकारने छापलेल्या कागदी नोटाच प्रचारात होत्या. फक्त सीमाभागामध्ये चँग-कै-शेकच्या श्वेतसरकाच्या नोटाही चालत. सोव्हिएटने चांदीची आणि तांब्याची नाणीही काढली होती. पण नानकिंग सरकारने आपली सर्व चांदीची नाणी वापरातून काढून घेतल्यावर सोव्हिएटनेही आपली नाणी काढून घेतली.

कागदावरच्या नोटा अपुऱ्या यंत्रसामुग्रीमुळे बऱ्याच ओबडधोबड असत. कधी-कधी कापडावरदेखील नोटा छापल्या जात आणि त्यावर 'चिनी क्रांति चिरायु होवो,' 'नागरी युद्ध थांबवा,' 'जपान्यांना हाकलून लावा' अशा तऱ्हेची घोषवाक्येही छापली जात. सोव्हिएट डॉलरला कोमिन्टांग डॉलरच्या जवळ जवळ बरोबरीची किंमत होती. चँग–कै–शेकने सोव्हिएटशी व्यापार करण्यास सर्वत्र चीनमध्ये बंदी घातली होती. परंतु अनेक चोरट्या मार्गांनी श्वेत चीनमधील व्यापारी लाल चीनशी व्यापार करीत असत. आणि आयात केलेल्या मालाची किंमत सोव्हिएट सरकार कोमिटांग डॉलर्समध्ये चुकवीत असे. हे डॉलर्स अर्थातच जप्ती-मध्ये आणि लुटीमध्ये मिळालेले असत.

अशा या सोव्हिएटमधील लोकांचे जीवन कसे होते ? पुरुष मोठ्या संख्येने लाल सेनेत भरती झालेले होते. आणि उरलेल्या लोकवस्तीतील प्रत्येक व्यक्ती संरक्षण दलापासून तो शेतीउत्पादनापर्यंतच्या वेगवेगळ्या व्यवसायात मग्न होती. बरीचशी स्वयंचलित वाहने लाल सैन्यासाठी राखून ठेवली होती. अगोदरच त्या भागामध्ये वाहने आणि रस्ते कमी होते. लाल सैन्याने आल्याबरोबर मात्र आपल्याबरोबर आणलेल्या यंत्रसामग्रीच्या साहाय्याने प्रमुख ठिकाणी टेलिफोन आणि टेलिग्राफच्या सोयी केल्या होत्या. त्यांचा वापर अर्थातच सरकारी सोयीसाठी असे. सरकारी कचेऱ्या, राहण्याची घरे सारी गुहांमधून कोरलेली असत.

## ॲना-माओ मुलाखत

स्वतः माओ-त्से-तुंगही येनान येथील दोन खोल्यांच्या एका गुहेमध्ये आपली पत्नी व मुलांसह राहत असे. त्याच्या गुहेच्या वरच्या बाजूच्या डोंगरातही अनेक गुहा होत्या आणि त्यातूनही सामान्य माणसे राहत. वरच्या गुहांतील मुले खेळू लागली की वरून घरंगळत येणारे दगड माओच्या 'अंगणा'त येऊन पडत. १४ कोटी लोक-संख्येच्या सोव्हिएटचा अध्यक्ष असलेल्या माओच्या घरासमोर एकही पहारेकरी नाही, हे बघून त्याला भेटायला येणाऱ्या पाश्चात्य पत्रकारांना आश्चर्य वाटे. तेव्हा त्याच्या डोक्यावर सुमारे अडीच लाख डॉलर्सचे बक्षीस होते ! माओ अगदी मुक्तपणे खेडुतांशी चर्चा करीत सोव्हिएटच्या खेड्यापाड्यांतून हिंडत असे. याच सुमाराला ॲना लुई स्ट्राँग नावाच्या एका अमेरिकन पत्रकार स्त्रीने येनान येथील गुहेतच माओची मुलाखत घेतली होती.

आपल्या गुहेसमोरच्या अंगणात माओ आणि ॲना बसले होते. माओशी त्याची धाकटी मुलगी खेळत होती. त्याच्या मांडीवर चढून, कधी उतरून माओच्या आस-पासच त्यांच्या संभाषणात मुळीच व्यत्यय न आणता ती खेळत होती. माओही अधूनमधून तिला कुरवाळीत होता. संभाषण सुरू झाले आणि एकदम गुहेवरच्या गवतात सळसळ झाली. "कोण आहे तिकडे ?" ॲनाने विचारले. वरच्या

गवतातून एखादा दगड किंवा हातबॉंब कुणीही सहज माओच्या अंगावर फेकू शकेल असा विचार ॲनाच्या मनात येऊन गेला.

" कुणी नाही. " माओ उत्तरला " वर एक दुसरं कुटुंब राहतं. माझ्या घरी कोण परदेशी पाहुणी आली आहे हे तिथली मुलं कुतूहलाने बघताहेत एवढंच. "

माओची बायको जवळच हे संभाषण ऐकत बसली होती. काही वेळानं ती उठून स्वयंपाक करण्यासाठी आत गेली. आणि शेजारच्याच बागेत पिकविलेले टमाटे, कांदे, शेंगा आणि तांदूळ यांपासून तयार केलेले काही पदार्थ घेऊन काही वेळाने बाहेर आली.

माओची उत्तरे अगदी साधी आणि सरळ होती. उत्तरे देण्याचे तो मुळीच टाळत नसे. ॲनाने विचारले, " कम्युनिस्ट कशासाठी लढताहेत हे मी अमेरिकनांना कसं समजावून सांगू ? "


माओ म्हणाला, " चंगच्या सेना गरीब, शांतताप्रिय लोकांना ठार करतात म्हणून ते लोक स्वसंरक्षणासाठी लढतात. अमेरिकनांना हे सहज समजू शकेल. "

" कम्युनिस्ट असा किती काळपर्यंत लढा देऊ शकतील ? "

" एक दिवसही लढण्याची आमची इच्छा नाही. पण लढायचे किंवा नाही हे आमच्या इच्छेवर अवलंबून नाही आणि जोपर्यंत आम्हांला लढणे भाग आहे तोवर आम्ही लढू. "

माओला आणि त्याच्या लाल सैन्याला या वेळी दोन आघाड्यांवर लढावे लागत होते. श्वेत सैन्याशी आणि दुसरी आघाडी श्वेत सैन्याने आपणहून उघडली होती. जपान्यांचा प्रतिकार मांच्युरियामधून चीनमध्ये घुसणाऱ्या जपानी आक्रमकांचा प्रतिकार ही माओची सुरुवातीपासूनची घोषणा होती आणि या घोषणेवरच माओने अवघ्या चीनची सहानुभूती मिळवली होती आणि साऱ्या सोव्हिएट क्षेत्रात लोकांमध्ये विलक्षण एकी साधली होती. जपानी आक्रमणाला विरोध करणारे हे सोव्हिटच्या प्रमुख ध्येयांपैकी एक होते. आणि त्याच्या यशापयशावरच सोव्हिएटचे आणि चीनमधील लाल चळवळीचे भवितव्य अवलंबून होते. [ अपूर्ण ]

स्वादिष्ट मिठाईसाठी
आम जनतेची निवड
**शर्मा स्वीट मार्ट**
दत्तमंदिराशेजारी,
मंडई रस्ता, पुणे २.




हिटलरला जाऊन आता वीस वर्षे झाली. त्याच्या साम्राज्य लालसेने जग चहुबाजूंनी अगदी थेट क्षितिजापर्यंत पोहत गेले यातही शंका नाही. त्याच्या नाझी हुकूमशाहीचे अनर्थ काय झाले हेही आपल्याला माहीत आहेच. असे असूनही हिटलरच्या व्यक्तिमत्त्वाचे आकर्षण आपल्या मधील काही लोकांना आहे. कानिटकरांच्या पुस्तकाची लोकप्रियता हा त्याचाच पुरावा


# झं झा वा ती
# पु रु षा र्था ची
# क हा णी

प्रा. वि द्या ध र पुं ड लि क

# नाझी भस्मासुराचा उदयास्त

आहे. काय कारणे आहेत याची ?

काही सांगता येतील. हुकूमशहाच्या व्यक्तिमत्त्वाचे लोकशाहीत वावरणाऱ्या लोकांना एक विचित्र आकर्षण असते. हुकूमशहा हे एक प्रकारचे दुबळ्या जनतेचेच विस्तारलेले रूप असते. हुकूमशहाचे कर्तृत्व लोकशाहीच्या – गतीच्या–तुलनेने एकदम भव्य वाटते. आणखी एक कारण असे, की केवळ सातआठ वर्षांत हिटलरने एका



'माणूस'मधून रा. म. शास्त्री या नावाने 'नाझी भस्मासुराचा उदयास्त' ही लेखमाला पूर्वी प्रसिद्ध होत होती तेव्हाच ती कमालीची लोकप्रिय झाली होती. हीच लेखमाला आता सचित्र आणि आकर्षक पुस्तकाच्या रूपात बाहेर आली आहे.

दुबळ्या, दुभंगलेल्या राष्ट्राचे जे पुनरुत्थान केले, त्यात एका ज्वलंत राष्ट्रवादाची सारी भयानक दीप्ती होती.

कानिटकर हे लेखक आहेत आणि लेखकाच्या संवेदनाक्षमतेनेच हिटलरचे जीवन-नाट्य त्यांनी टिपले आहे. त्यांना विवेचन करावयाचे नाही. तो त्यांचा हेतू नाही. हिटलरच्या उदयाचा आणि अस्ताचा पट त्यांनी शिरर, बुलॉक, चर्चिल, हीबर्ट, ब्रियांट इत्यादी अनेक पाश्चात्य लेखकांनी लिहिलेल्या पुस्तकांच्या आधारे उलगडून दाखविला आहे. याचा अर्थ असा नाही की, कानिटकरांना स्वतःचे असे सांगावयाचे नाही, त्यांना ते सांगावयाचे आहे. पण मुख्यतः "सारे जग श्वास रोखून बसेल" असे बेगुमानपणे सांगणाऱ्या एका भस्मासुराची इतिहासातील एक कहाणी त्यांना सांगावयाची आहे आणि ती सांगता सांगता काही सांगावयाचे, खरे म्हणजे सुचवावयाचे आहे.

ही कहाणी त्यांनी चांगली सांगितली आहे. हिटलरच्या जीवनाचे त्यांनी पूर्वार्ध आणि उत्तरार्ध असे भाग केले आहेत. पण त्यातही प्रत्येकात दोन विभाग आहेत. म्हणजे एकंदर चार विभागांत या ग्रंथाची रचना आहे. पहिला संघटक आणि राष्ट्रनिर्माता हिटलर, एस्. ए., एस्. एस्. या संघटना हिटलरने कशा निर्माण केल्या. जर्मनीला एक निशाण, एक विधान आणि एक प्रधान कसे मिळवून दिले हे त्यांनी सांगितले आहे. दुसऱ्या विभागात हिटलरने शैक्षणिक, आर्थिक आणि सैनिकी पुनर्रचना कशी केली याची कथा आहे. या सामर्थ्याच्या जोरावर ऱ्हाईनलँडपासून ऑस्ट्रियापर्यंत हिटलरचे गरूड पंख कसे झेपावत गेले याचेही दिग्दर्शन या भागात आले आहे. उत्तरार्धाच्या पहिल्या भागात म्हणजे तिसऱ्या भागात महायुद्ध सुरू झाल्यानंतर फ्रान्सच्या पाडावापर्यंतच्या हिटलरच्या झंझावाती पुरुषार्थाची



१० मे १९४०
मंत्रिपदाच्या
स्वीकारासाठी
निघालेले
विन्स्टन चर्चिल

कहाणी आहे. आणि शेवटच्या चौथ्या भागात हा भस्मासुर, रशियातील दुसऱ्या आघाडीपासून कसाकसा कोसळत गेला, त्याचे वर्णन आहे.

या सगळ्या विभागांत कुठेही विस्कळीतपणा जाणवत नाही. अनेक विद्युत्वेगाने घडलेल्या, इकडचे जग तिकडे करणाऱ्या वीस वर्षांतील असंख्य घटना. पण कानिटकरांच्या निवेदन-शैलीच्या लयीमुळे आपण तुकडे तुकडे वाचीत आहोत असे केव्हाही जाणवत नाही. या सगळ्या कहाणीमागचे अनेक लेखकांचे साहित्य त्यांनी एका सूत्रात आणले आहे. आणि ही सूत्रमयता अशा लालित्याने आणली आहे की या कहाणीला अहवालाचा—Reportage चा—रुक्षपणा आलेला नाही. उदाहरणार्थ, डंकर्कच्या पराभवाच्या रात्रीतून चर्चिल यांची प्रकाशवाणी कशी घुमली त्याचे वर्णन कानिटकरांनी कसे केले आहे पाहा—

"अशा या नैराश्यरात्रीतूनही धीराचा आवाज आला. आवाजापाठोपाठ फक्त शब्द आले. नुसते शब्दच. परंतु प्रत्येक शब्द हा ठिणग्यांसारखा उडाला होता. असे शब्द युगायुगात एखाद्या वेळेसच उच्चारले जातात. अशाच भीषण काळरात्रीत त्यांचा जन्म असतो. परंतु एकदा ते उच्चारले की मग ते फक्त शब्द म्हणून उरतच नाहीत. त्या शब्दांची नक्षत्रे होऊन इति-हासाच्या पटावर ते अक्षय्य होऊन राहतात."

कानिटकरांच्या पुस्तकातून एक वेगळे जग दिसते. हे जग पडद्यामागचे असते. वीरांचे, नेत्यांचे, सेनापतींचे, मुत्सद्यांचे हे जग. या जगातला पराक्रम, आशा-निराशेचे हेलकावे, कट-कार-स्थाने, सुंदर-असुंदर, सुष्ट-दुष्ट, करुण-क्रूर अशा अनेक रोमांच-कारी पण रहस्यासारख्या वाटणाऱ्या नाट्यमय घटना त्यांनी खुल्या करून दाखविल्या आहेत.

कानिटकर यांचे पुस्तक ललित असले तरी त्याच्या वाचनाने अनेक प्रश्नांचे काहूर मनात उसळते. भारताला अर्थविकास हवा आहे, अगदी झपाट्याने हवा आहे. तो करून घेताना राष्ट्रवादाचे चैतन्यही लोकमानसात उत्पन्न करावयाचे आहे. पण हे करताना लोकशाहीचा धर्मही सोडावयाचा नाही. हा अतिशय अवघड असा प्रवास कित्येक वर्षे एका ताणलेल्या मनःस्थितीत आपल्याला करावा लागणार आहे. तो करताना कुठले कुठले प्रश्न उभे राहतात हे या पुस्तकावरून कळते. ज्वलंत राष्ट्रवाद, लोकशाही आणि समाजवाद ही तिन्ही तत्त्वे बरोबर जाऊ शकतात. नाही असे नाही. पण ती गेली नाहीत तर राष्ट्रवादातून हुकूमशाहीचा भस्मासूरही निर्माण होऊ शकतो. पण अनेकांना प्रश्न पडतो तो असा की, आपल्या भारतात जे लोकशाहीवादी आणि समाजवादी आहेत, त्यांचा राष्ट्रवाद दुबळा तर नाही ना? आणि जे राष्ट्रवादी आहेत, त्यांना लोकशाही हे सर्वोच्च मूल्य आहे हे मान्य आहे का? या विशिष्ट संदर्भात या पुस्तकासारखी अनेक पुस्तके आपल्या साहित्यात आली पाहिजेत.

●

[ आकाशवाणीच्या सौजन्याने. ]


| | |
|---|---|
| परसूच्या पशुकथा | वसंत सबनीस |
| सहा साहसे | दा. सी. देसाई |

मूल्य प्रत्येकी दोन रुपये

राजहंस प्रकाशन, ४१९ नारायण, पुणे २.




गाजलेल्या 'गज्जनसिंग खून खटल्या 'चा आज निकाल लागणार होता! सेशन्स कोर्टात मुंगी शिरायला जागा नव्हती. आजुबाजूच्या खेड्यांतले असंख्य खेडूत कितीतरी लवकर येऊन 'जागा धरून' होते. प्रेस रिपोर्टर्स, पोलिस अधिकारी, वकीलवर्ग व दरोडेखोरांना बघायला म्हणून आलेली उच्चवर्णीय मंडळी, नाटक सुरू होण्यापूर्वी एकमेकांकडे उगाचच बघतात, तशी बघत होती. स्त्रियांसाठी असलेल्या खास जागेत सेशन्स जज्जांची पत्नीदेखील येऊन बसली होती! दरवाजावरचे पोलिस गर्दी हटवण्याचा आटापिटा करीत होते आणि...

जज्जसाहेब येत असल्याचा इशारा दिला गेला. कोर्टात भयानक उत्सुकता पसरली. आपोआप शांतता निर्माण झाली. इन्स्पे. हझारासिंग पूर्ण गणवेशात हजर झाले होते. त्यांच्याकडे अनेकांच्या नजरा कौतुकाने लागल्या होत्या. कडक पोलिस बंदोबस्तात लाकडी पिंजऱ्यात बसलेले कर्तारसिंग, करमसिंग, सुखनसिंग आणि भागासिंग आपापले भवितव्य जाणून घेण्यासाठी उत्सुक झाले होते. त्यांच्या चेहऱ्यांवर उत्सुकतेपेक्षा भीतीच जास्त स्पष्ट दिसत होती. चौघेही फाशी जातील की फक्त दोघे आणि बाकीच्यांना जन्मठेप? याची चर्चा अनेक दिवस होत होती.

*इन्स्पेक्टर हझरासिंगांनी मोठ्या कौशल्याने सर्व पुरावा मनासारखा जमवून खटला सेशनकमिट केला. कर्तारसिंग, करमसिंग, सुखनसिंग व भागासिंग यांच्यावर गज्जनसिंग व हरजितसिंग यांच्या खुनाचा आरोप नक्की शाबीत होणार याची त्यांना खात्री होती. कोर्टात जाब-जबान्यांचं काम सुरू झालं. सरकारी वकिलांची बाजू ऐकून ज्या श्रोत्यांना 'यांना फासावर लटकवलंच पाहिजे' असं वाटत होतं त्यांनाच आरोपींच्या वकिलांचं भाषण ऐकून 'आरोपी निर्दोषी'-च असावेत असं ठामपणानं वाटायला लागलं. खटल्याच्या निकालाबद्दल औत्सुक्य फारच ताणलं जाऊ लागलं —*

# ॲड. माधव कानिटकर

## लेखांक : सातवा

...न्यायमंचकाच्या डाव्या हाताला लघु-लेखकाकडे पाहत पाहत जज्जसाहेब निकालपत्र तोंडी सांगू लागले. आणि गर्दी करणाऱ्या लोकांची पंचाईत झाली! एकतर जज्जसाहेब निकाल इंग्रजीत सांगत होते तोदेखील इतक्या हळू आवाजात की, अगदी पहिल्या रांगेतील वकिलांशिवाय मागे कुणालाही तो ऐकू येत नव्हता. घड्याळाचा काटा हळूहळू पुढे सरकत होता. इतका वेळ ऐकू न येणारी कोर्टातल्या पंख्यांची भिरभिर जाणवू लागली होती. त्यांच्या फिरत्या सावलीमुळे वातावरण अधिकच कुंद झाले होते. निकालपत्र सांगताना जज्जसाहेब, ... "अमका तमका आपल्या साक्षीत असं सांगतो की–" असं म्हणून त्या साक्षीदाराचे नाव जरा मोठ्याने घेत. नेमका तोच साक्षीदार हजर असला तर एवढ्या मोठ्या केसमध्ये साक्षीदार म्हणून का होईना पण आपले नाव आले या जाणिवेने तो सुखावत होता. कपड्यावरून 'याला इंग्रजी येत असावं' असं वाटणाऱ्या शेजाऱ्याला ढोसकून तो हळूच विचारीत असे, "हमारे बारेमें जज्जसावने क्या कहाँ?" आणि पोलिसी धाकाने 'इंग्रजी येणारा' हातानेच गप्प बसायला सांगत होता. जवळ जवळ २॥–३ तास हा प्रकार विचित्र उत्सुक-

तेच्या वातावरणात चालू होता. शेवटी फक्त शिक्षा सुनावण्यासाठी जज्जसाहेब तयार झाले. आरोपींच्या भाषेत त्यांना शिक्षा समजावून सांगण्यासाठी दुभाषा (Interpretar) उभा राहिला. आणि अखेर निकाल बाहेर पडला... आपल्याकडच्या खेळाडूने विरुद्ध बाजूने खेळणाऱ्या चांगल्या फलंदाजाचा झेल सोडला म्हणजे आश्चर्य, दुःख, संताप व्यक्त व्हावा, तशा अर्थाचे उद्‌गार निघू लागले. दुभाष्या सांगत होता –

" आरोपी नंबर १ कर्तारसिंग ! तुझी निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे !

आरोपी नंबर २ करमसिंग ! ८ एप्रिल १९५४ ला सिंघावाला या खेड्यात गज्जनसिंग व हरजितसिंग या दोघांचा गोळ्या घालून खून केल्याचा आरोप तुझ्यावर संशयातीतरीत्या सिद्ध झाला आहे. सबब इंडियन पिनल कोडाच्या कलम ३०२ प्रमाणे तुला फाशीची शिक्षा देण्यात येत आहे.

आरोपी नंबर ३ व ४ सुखनसिंग व भागासिंग तुम्हांला निर्दोषी ठरविण्यात आले आहे ! "

एकूण ४ आरोपींपैकी तीन आरोपी निर्दोष सुटले होते ! कटाचा सूत्रधार कर्तारसिंग निर्दोषी ठरला होता ! या खटल्यात कर्तारसिंगाच्याविरुद्ध साक्ष देणाऱ्या लोकांच्या घशाला कोरड पडली ! आपल्या सर्व बाजूंनी कुणीतरी बंदूक घेऊन येत आहेत, असा त्यांना भास होऊ लागला ! खळबळजनक निकाल ऐकून जो तो कोर्टातून बाहेर पडण्यासाठी धडपडू लागला ! जज्जसाहेब केव्हाच उठून गेले होते ! साधक बाधक चर्चा आता मोठ्या आवाजांत होऊ लागली. कर्तारसिंग सुटला याचा अर्थ त्याने सेशन्स जज्जाला काहीतरी 'दिले' असले पाहिजे इथपर्यंत मजल गेली. न्यायावरचा विश्वास डळमळीत झाला. मात्र न्यायशास्त्र जाणणाऱ्या फारच थोड्या लोकांना कळले होते की, सेशन्स जज्जांचा निकाल काटेकोर आहे ! खऱ्या अर्थाने निःपक्षपाती आहे ! कारण, असा निकाल देण्याची सबळ कारणे जज्जसाहेबांनी जज्मेंटमध्ये विशद करून सांगितली होती !

कर्तारसिंगाला कोर्टाने संशयाचा फायदा (Benefit of Doubt) दिला होता ! त्याच्याविरुद्ध सरकारतर्फे सादर केल्या गेलेल्या पुराव्यात तो दरोडेखोर आहे, यापूर्वीदेखील त्याचा खुनांशी संबंध आला आहे, ६ एप्रिलला त्याचं मोघाहून आग्ऱ्याला जाणं, गज्जनसिंगाबरोबर त्याचे असलेले शत्रुत्व, खुनाच्या काळात त्याने स्वतःला करवून घेतलेली अटक व एकंदर वागणूक याच गोष्टींवर भर देण्यात आला होता. निःपक्षपाती न्यायदेवतेला अशी कुसंगती मनात धरून न्याय देण्यासाठी बसायचे नसते, न्यायासनासमोर आणली गेलेलो आरोपी व्यक्ती ही निर्दोषी आहे असं धरून चालायचं असतं, त्याच्यावर असलेला आरोप सिद्ध करण्याचे काम आरोप करणाऱ्या पोलिसांचे असते. या खटल्याच्या बाबतीत तसा पुरावा पुढे आलेला नाही !

प्रत्यक्ष खून झाला त्या वेळी–नव्हे त्याच्याही पूर्वी काही तास–कर्तारसिंग तुरुंगात

होता हे सरकारपक्षानेदेखील मान्य केलेले आहे. कर्तारसिंगाची बंदूक या खुनाच्या कामात वापरण्यात आलेली नाही, हे आग्ऱ्याच्या बंदुका दुरुस्त करणाऱ्या व्यक्तीच्या साक्षीवरून स्पष्ट झाले आहे शिवाय त्याची साक्ष अविश्वासार्ह आहे असंही म्हणायला जागा नाही. (There is no reason to disbelieve in him). ज्या तऱ्हेने त्यांनी साक्ष दिली त्यावरून तर तो कर्तारसिंगाच्या बचावासाठी आला आहे, असं मुळीच वाटत नाही. कर्तारसिंग आणि करमसिंग या दोघांनी एकदमच मोघाहून आग्ऱ्याला प्रयाण केले म्हणून त्या दोघांचा खुनाचा कट असला पाहिजे असं धरून चालणं योग्य होणार नाही. 'अ' आणि 'ब' या दोन व्यक्ती एकदम घराबाहेर पडल्या, 'ब'च्या मनात 'क' चा खून करण्याचा विचार होता व ते दोघे वेगवेगळे गेल्यानंतर 'ब' ने 'क' ला ठार मारले म्हणून 'अ' ला पण शिक्षा द्यायची? कदाचित् 'ब' च्या मनात काय आहे हे 'अ' ला ठाऊकदेखील नसेल. कदाचित कामगिरीवर जाता जाता सहज म्हणून 'ब' हा 'अ'ला भेटला असेल. अशा एकदम जाण्याला कट असं म्हणत नाहीत. याउलट कर्तारसिंगाचा बचाव हा अधिक भक्कम आहे. त्याच्या मते खून झाले त्या वेळी तो सिंघावाला खेड्यातच नव्हता. (He has proved a perfect alibi) त्याचे कुठलेही हत्यार या कामात वापरले गेलेले नाही. वर वर पाहता कर्तारसिंगाने बचावाची इतकी कडेकोट तयारी केली, याचा अर्थच त्याचा या खुनाशी संबंध होता असं वाटतं हे खरं; पण निकालपत्र हे कधीही काय वाटतं याच्यावर अवलंबून नसतं. कर्तारसिंगाचा आणि करमसिंगाचा कट सरकारपक्ष सिद्ध करू शकलेला नाही. फौजदारी कायद्यामध्ये न्यायमूर्तीवर असे बंधन आहे की, ज्या वेळी एखादा आरोपी एका बाजूने विचार केला तर दोषी ठरतो, पण दुसऱ्या बाजूने विचार केला तर तो निर्दोषी ठरतो याचा अर्थ त्याचे अपराधित्व संशयास्पद आहे आणि मनाच्या या अवस्थेत आरोपीला संशयाचा फायदा द्यावाच लागतो. यामुळे एखादा 'गुन्हेगार' सुटला तरी चालेल पण निरपराधी फासावर लटकता कामा नये!

आरोपी नंबर २ करमसिंग याच्याविरुद्ध मात्र भरपूर पुरावा पुढे आलेला आहे. एकूण ५ साक्षीदारांनी खून झालेले प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहिले आहेत व त्यांच्यापैकी प्रत्येकजण करमसिंगानेच गोळ्या घातल्या असं सांगतो. त्यांच्या सांगण्यामध्ये आरोपीच्या वकिलाने कसून उलटतपासणी (Searching Cross Examination) घेऊनदेखील कुठेही विसंगती (Contradictions) नाही. उलट असलाच तर आत्मविश्वास आहे. खुनाच्या काही तास अगोदर तो सिंघावाला खेड्यातच होता ही गोष्ट तहसीलदार अच्चरसिंग, त्या गावचा सुधामल मारवाडी व त्याचा मुलगा बनारसीदास यांच्या साक्षींवरून स्पष्ट झाली आहे. आणि या गोष्टींना मदत होणारी सगळ्यात महत्त्वाची बाब म्हणजे करमसिंगाचा बचावच त्याला दोषी ठरवतो आहे! ८ एप्रिल १९५४ म्हणजे खून झालेल्या दिवशी आपण सिंघावाला

खेड्यातच नव्हतो हा त्याचा बचाव त्यानेच खोटा पाडला आहे. त्याच्या म्हणण्या-प्रमाणे ८ एप्रिल १९५४ ला तो आग्र्यात होता असं सांगणारा आग्र्याचा एकही स्वतंत्र साक्षीदार कोर्टापुढे त्याने आणला नाही. त्याचा बचावाचा एकमेव साक्षीदार गुरदयालसिंग, जो आपल्या साक्षीत असं सांगतो की, ८ एप्रिल १९५४ ला त्याचा मित्र करमसिंग याला त्याने शपथनामा (Affidavit) करण्यासाठी म्हणून त्याच्या ओळखीच्या वकिलाकडे नेले होते—तो उघड उघड करमसिंगाचा मित्रच आहे. त्याच्या साक्ष देण्याच्या पद्धतीवरून व सरकारी वकिलाने त्याची उलट-तपासणी घेत असताना त्याची केलेली दुर्दशा पाहून तो साक्षीदार खोटा आहे याबद्दल माझी खात्री पटलेली आहे. साक्षीच्या पिंजऱ्यात त्याची अवस्था दयनीय झाली होती. (He cut a poor picture in the witness box.)

करमसिंगाचे ॲफिडेव्हिट करणारे वकील उलटतपासणीत असं कबूल करतात की, ८ एप्रिल १९५४ पूर्वी त्यांनी करमसिंगाला कधीही पाहिलेले नव्हते. आणि तरीदेखील त्यांनी वकील या नात्याने करमसिंगाची ओळख पटविण्याचा प्रयत्न ॲफिडेव्हिटवर वकील या नात्याने सही करून केला होता. वकिलीच्या पेशाला न शोभणारे हे त्यांचे कृत्य असले तरी ते जाणून बुजून मात्र केलेले नाही. कारण मॅजिस्ट्रेटच्या कोर्टात अशी ओळख पटवून देणारे वकील असतात. या प्रथेला पायबंद घालणे हे मात्र न्यायमूर्तींचे काम नव्हे. त्यासाठी वेगळे अधिकारी आहेत. सरकारी वकिलांनी या 'वकिला'च्या उलटतपासणीचे वेळी एक खोचक प्रश्न त्यांना विचारला (Damageing Question) तो म्हणजे "वकीलसाहेब ! ज्या करमसिंगाची ओळख आपण ८ एप्रिल १९५४ ला आग्र्याच्या मॅजिस्ट्रेटसाहेबांना करून दिलीत तो करमसिंग आणि आत्ता आरोपीच्या पिंजऱ्यात बसलेला करमसिंग या दोन्ही व्यक्ती एकच आहेत का ?" आणि या प्रश्नाला वकिलाने असे उत्तर दिले आहे की, "ते मला आता नक्की सांगता येणार नाही !" याचा अर्थच असा की प्रत्यक्ष खून करणारा करमसिंग आणि त्याच दिवशी आग्र्याला मॅजिस्ट्रेटपुढे नेण्यात


## बिहार रिलीफ कमिटी

बिहार दुष्काळ पीडित लोकांना मदत पाठविण्यासाठी 'बिहार रिलीफ कमिटी'च्या वतीने, मुंबईत एक केंद्र उघडण्यात आले आहे. हे केंद्र सोमवार ते शनिवार सकाळी ६ ते सायंकाळी ७ पर्यंत, तसेच रविवार व सुटीच्या दिवशी सकाळी १० ते ५ पर्यंत उघडे राहील. मदत पाठवणाऱ्या व्यक्तींनी आणि संस्थांनी रोख रक्कम अथवा 'बिहार रिलीफ कमिटी'च्या नावाने चेक्स, खालील पत्त्यावर पाठवावेत. — संयोजक

**मुंबई सर्वोदय मंडळ**, माणिभवन, १६, लॅबरमन रोड, गावदेवी, मुंबई– ७.

आलेला 'करमसिंग' या दोन वेगवेगळ्या व्यक्ती आहेत. आरोपी नंबर २ करमसिंग हा त्याच दिवशी आग्र्याच्या मॅजिस्ट्रेटपुढे शपथनामा करणारा करमसिंग नव्हे! उलट खोटा पुरावा तयार करून आरोपीनेच आपला बचाव खोटा असल्याचे सिद्ध केले आहे. विशेषत: आरोपी करमसिंग हा मूळ ॲफिडेव्हिट (Original) आपण आपल्या मित्राकडे ठेवले असून त्याच्या फोटोस्टेट कॉपीज आपणांकडे ठेवल्याचे सांगतो. असं करण्याचं काही कारण होत काय? सर्वसामान्य माणूस काही कामानिमित्त ॲफिडेव्हिट करतो तेव्हा असा वागत नाही. आपण केव्हा ॲफिडेव्हिट केलं. याची तारीखदेखील सामान्य माणूस विसरतो! पण इथे मात्र प्रकार उलटा आहे. ८ एप्रिल १९५४ ला आपण सिंघावाला खेड्यात नव्हतो, असा बचाव घेता यावा म्हणून करमसिंगाने प्रत्यक्ष खून करण्यापूर्वीच तशी कागदोपत्री पुराव्याची व्यवस्था केली असली पाहिजे. ही व्यवस्था त्यानेच केली असली पाहिजे. कारण त्या शपथनाम्याची मूळ नक्कल त्याच्याच एका मित्राकडे आहे असं तो स्वत:च खात्रीपूर्वक सांगतो! खून झाले त्या वेळी आपण सिंघावाला खेड्यातच नव्हतो हा त्याचा बचाव अपूर्ण आहे (Imperfect alibi) आणि म्हणूनच तो अमान्य करून मी त्याला फाशीची शिक्षा ठोठावत आहे.!

आरोपी नंबर ३ आणि ४ यांच्यावर कुठल्याच प्रकारचा आरोप सिद्ध झालेला नाही. करमसिंगाला प्रत्यक्ष खून करताना पाहणारी माणसंदेखील सुखनसिंग आणि भागासिंग या ३ व ४ नंबरच्या आरोपींना ओळखू शकलेले नाहीत. सुखनसिंग आणि भागासिंग हे खून झाले तेव्हा तिथे नव्हते हेच यावरून सिद्ध होत आहे. गावकऱ्यांनी करमसिंगाबरोबर असलेल्या अनोळखी लोकांची वर्णने त्यांच्याशी जुळतात हा 'पुरावा' होऊ शकत नाही. अटक झाल्यानंतर आपल्या गुन्ह्याचा त्यांनी पोलिसांसमोर दिलेला कबुलीजबाब हा खऱ्या अर्थाने कबुलीजबाब म्हणता येणार नाही! कारण कोर्टापुढे दोघांनीही गुन्हा नामंजूर केलेला आहे. पुराव्याच्या अभावी मी त्यांची निर्दोष मुक्तता करीत आहे.!

सेशन्स जज्जांनी दिलेल्या या निकालपत्राने इन्स्पे. हजरासिंगांचा चेहरा काळा पडला! प्रत्यक्षात नसले तरी ४ पैकी ३ आरोपी पुराव्याच्या अभावी सुटतात याचाच अर्थ इन्स्पे. हजरासिंगांनी काम ढिलाईने केलेले आहे! नशिबाची गोष्ट एवढीच की सेशन्स जज्जांनी तसा शेरा मात्र मारला नव्हता! इन्स्पे. हजरासिंगांचे सगळेच ग्रह फिरले होते की काय कोण जाणे! कारण, झाला हा निकाल, झाली ही शोभा काहीच नव्हे अशी बातमी त्यांना समजली आणि ती म्हणजे करमसिंग अपील करणार होता!...आणि खुद्द सरकारी वकिलाने त्यांना हळूच सांगितले होते की, कदाचित करमसिंगदेखील अपिलात निर्दोषी ठरेल! "हेचि काय फळ मम तपाला?" अशा विमनस्क स्थितीत इन्स्पे. हजरासिंग गंभीर चेहऱ्याने सेशन्स कोर्टातून खाली मान घालून बाहेर पडले. (अपूर्ण)

# तुमचे भविष्य आमच्या ओंजळीत



**श्री. गो. जोशी**
सायनाचार्य, नासिक

दि. १८ ते २४ फेब्रुवारी १९६७

**मेष** : या वेळी तुमचा अहंकार पेटून उठेल, धगधगत्या निष्ठेने प्रत्येक पाऊल टाकले जाईल. आणि हे सर्व भारतीय लोकशाहीचा नवा अध्याय लिहिण्याच्या उद्देशाने लोकशाहीतील पावित्र्य असते, किती महत्त्व असते याचे साक्षात् दर्शन घडेल याच आठवड्यात. या वेळेची तुमची भूमिका मंत्र्याची नसून मंत्रि-निर्मात्याची आहे.

या वेळी तुमच्या मतांच्या फटकाऱ्याने अनेक बडी धेंडे धुळीला मिळतील, साधी-सुधी माणसे राजसिंहासनावर आरूढ होतील.

सध्याचा तुमचा काळ पडद्याआड राहून काम करण्याचाच आहे. आघाडी-वर राहण्याच्या फंदात पडू नका. तुमच्या कृतीने सारा समाज ढवळून निघेल. निवडणुकीच्या मंथनातून अमृतकुंभ हाती येऊ शकेल. दि. १८ ते २१ अत्यंत घाईगर्दीचा काळ.

**वृषभ** : निवडणुकीच्या यज्ञकुंडात पवित्र मतांचे हवन करताना पात्रापात्र-तेचा विचार करा. तुमच्या वैचारिक स्वातंत्र्याची बूज राखा. अशी संधी पुन्हा पाच वर्षे मिळणार नाही. तुमचे सहकार्य ज्याला लाभेल, तुमचे कर्तृत्व ज्याच्यासाठी खर्ची पडेल तो भाग्यवान्.

शुक्र एकादशात, सूर्य दशमात. तुमचे सारे प्रयत्न घवघवीत यश घेऊन उठतील.

तुमची धावपळ धडपड कारणी लागेल. या आठवड्यात आपणांस अविश्रांत परिश्रम करावे लागतील. त्या परिश्रमांचे श्रेयही तसेच अपेक्षेप्रमाणे लाभेल.

मागे राहणे रेंगाळणे, घोळ घालीत बसणे हे सारे विसरून जा. जाल तिथे आवाज उठवाल, कराल त्यात अनन्यसाधारण यश मिळवाल. प्रवास खूप घडेल, खर्चही अफाट होईल, परिचय होतील. दि. १९ ते २२ अपेक्षा सफल होतील.

**मिथुन** : सूर्य-बुध भाग्यस्थानी प्रवेश करताक्षणीच तुमचा भाग्यलेख लिहिण्यास प्रारंभ झाला. शिवाय मंगळ गुरुस्थानी साऱ्या ग्रहांची सदिच्छा तुमच्या पाठीशी उभी आहेच. भारतीय उत्क्रांतीच्या पर्वकालात तुम्हीही सहभागी व्हाल.

या आठवड्यात हृदयावर ठसा उमटवणाऱ्या अनंत प्रगत घटना घडून येणार आहेत. व्यावसायिक वातावरण प्रगत बनेल. सांपत्तिक अनुकूलता सर्वत्र दिसू लागेल, अनेकांचे हार्दिक सहकार्य न मागताही मिळू लागेल.

या आठवड्यात दूरचे प्रवास घडतील. सामाजिक प्रतिष्ठा उंचावेल, राष्ट्रीय दौरे काढावे लागतील आणि तुमचे परिश्रम ज्यांच्यासाठी खर्ची पडतील त्यांना नेत्रदीपक यश लाभेल. कौटुंबिक मंगलकार्याचा प्रश्नही याच काळी सुटेल.

दि. २० ते २३ सर्वोत्तम यशदायी काल.

**कर्क** : या काली सूर्य -- मंगळासारखे समर्थ ग्रह तुमच्यावर नाराज आहेत. एकटा गुरू अनुकूल आहे या भरंवशावर राहू नका. हाती घेतलेली कामे यशस्वी करण्यासाठी जिवाचे रान करावे लागेल. सहजासहजी काही घडेल, ही आशाच नको.

कौटुंबिक कलह आणि क्लेश, सांपत्तिक पेच आणि ताण, व्यावहारिक महत्त्व आणि असहकारता इत्यादी अनेक अनिष्ट प्रकारांनी हा काल भरलेला आहे. प्रतिष्ठेला धक्का लागणार नाही एवढे एकच समाधान.

या काली प्रत्येक गोष्ट जपून आणि नम्रतेने केलीत तरच थोडेफार यश पदरी पडण्याची शक्यता. आव्हान करणे या दोन्हीही गोष्टी या वेळी प्रकर्षाने टाळा.

दि. १८-१९-२२ थोडा फार यशदायी काल.

**सिंह** : तुमच्या राशीचे दैवत सूर्य आणि त्याचा पराक्रमस्थ मंगळाशी अंशपूर्ण त्रिकोण (दि. २१) एवढ्या भांडवलावरही तुम्ही गड जिंकाल, शत्रूला नेस्तनाबूत कराल. मग तो शत्रू कितीही मातबर असो !

या वेळचा पराक्रमस्थ मंगळ आपली सारी शक्ति-युक्ती पणास लावून तुमचे ईप्सित सिद्धीस नेईल, खूप प्रवास करावा लागेल, राष्ट्रीय सामाजिक कार्यक्रमात आघाडीवर राहण्याचा मान तुम्हांलाच मिळेल. तुमच्या अंगच्या असाधारण कर्तृत्वाचे जगाला दर्शन घडेल. भारतीय निवडणुकीत विरोधकांची डिपॉझिटे जप्त करण्याचा मान फक्त तुम्हांलाच मिळेल. खर्चाला काही ताळमेळच राहणार नाही. असे असले तरी, अपयशाचा डाग चुकूनही लागू शकणार नाही सभा गाजवाल, कोणत्याही क्षेत्रात आवाज उठवाल. दि. १९ ते २१ या कालाची नोंद करा.

कन्या : या वेळच्या शनि-मंगळाच्या प्रतिकूलतेची मुळीच खंत वाळगू नका. एकटा गुरू तुमच्या साऱ्या योजना सिद्धीस न्यायला समर्थ आहे. त्याच्या कृपेनेच प्रतिपक्षी नामोहरम होईल त्याच्या सहकार्यानेच हवा तेवढा पैसा उभा करू शकाल.

तुम्हापैकी काही महाभागांना आगामी राज्ययंत्रणेत मंत्रिपद भूषविण्याचाही मान मिळेल. आपल्या चारित्र्याच्या दालनातील काही काही विभाग बृहस्पती-प्रजापतीच्या कृपेने जगातील सर्व वैभवांनी आणि ऐश्वर्यांनी फुलून गेलेला दिसेल.

व्यवसायक्षेत्रही प्रगत बनेल, आणि कौटुंबिक वातावरणातही अनेक अत्यानंदाच्या घटना घडून यायला लागतील. वैचारिक संघर्ष मिटतील, अपेक्षित यश पदरी पडेल, सामाजिक प्रतिष्ठा खूपच उंचावेल.

दि. २१ ते २२ अपेक्षासाफल्याचा काल.

तूळ : मंगळ तुमच्या राशीत आल्यापासून आपणांस काही वेगळाच अनुभव येऊ लागला असेल. बाराव्या मंगळापेक्षा हा पहिला मंगळ काहीसा बरा असला तरी हरवलेले स्वास्थ्य लाभण्याची शक्यता कमीच. दि. २१ चा सूर्य-मंगळ त्रिकोण मात्र तुमच्यातील कर्तृत्व–निर्धार–निष्ठा यांना जाग आणील.

नवे क्षेत्र गवसेल, नव्या क्रांतिकारक विचारांना उत्थान मिळेल. निवडणुकीचे क्षेत्र गाजवून सोडाल. सांपत्तिक लाभाला हा काळ फारसा अनुकूल नाही.

या आठवड्यात धावपळ धडपड खूपच करावी लागेल. थोरांचे सहकार्य मिळवून नवे कार्यक्षेत्र उभारावे लागेल.

दि. २१ ते २३ या वारी अनेक आश्चर्यकारक घटना घडून याव्यात.

वृश्चिक : सूर्य चौथा–मंगळ बारावा, तुमच्या प्रगत जीवनाला हे आव्हानच आहे. तसं अनिष्ट असं काहीच घडणार नाही, पण हाती घेतलेली कामे गतिहीन बनतील, विरोधाला क्षणोक्षणी तोंड द्यावे लागेल. भाग्यस्थ गुरूचे माहात्म्य काहीसे झाकळल्यासारखे जाणवेल.

तरीसुद्धा या वेळचा सूर्य–मंगळ त्रिकोण (दि. २१) आचार आणि अघटित असे काही हातून घडवून आणील, नेत्रदीपक आणि भव्य यश पदरी टाकील, प्रतिष्ठा आणि लोकमान्यता कळसाला पोचवील.

या वेळी अनवश्यक खर्चाला आळा घालायचा प्रयत्न करा. आणि विरोधकांशी दोन हात करायची ऊर्मी निर्माण होऊ देऊ नका.

दि. २२ ते २४ बरीच कामे यशस्वी होतील.

धनू : मंगळ लाभात आणि सूर्य पराक्रमात अनिष्ट. शनि–गुरूंना हे निश्चित शह देऊ शकतील. गेल्या महिन्याभरातील अस्वस्थता आणि अनिश्चितता हे दूर करू शकतील. दि. २१ हाच तुमच्या यशाचा केंद्रबिंदू नव्या आशा अंकुरायला लागतील, निवडणुकीच्या धमालीत आवाज उठवाल, अपेक्षेबाहेर यशस्वी व्हाल.

परिस्थितीला एकदम कलाटणी मिळाल्यासारखे जाणवेल, आशाही करायला

जागा नाही तिथे प्रचंड यश निर्माण करू शकाल.

या वेळी प्रत्यक्ष लाभ जरी फारसा झाला नाही तरी प्रतिष्ठा खूपच उंचावेल.

दि. २०–२१–२२ अपेक्षित यश पदरी पडावे.

**मकर** : मंगळ-रवि-शनी सारेच कर्तृत्वसंपन्न ग्रह तुम्हांला अनुकूल असल्यामुळे या वेळी प्रत्येक क्षेत्रात आघाडीवर राहण्याचा मान तुम्हांलाच मिळेल. अपयश, नैराश्य, तुमच्या आजूबाजूलाही फिरकू शकणार नाही.

प्रामुख्याने निवडणुकीच्या क्षेत्रात तुम्ही ज्याला हात द्याल तो प्रचंड यशाचा धनी होईल. तुमच्यापैकी कित्येक व्यक्ती आगामी भारतीय राज्यातील सूत्रधार बनतील.

या आठवड्यातील सूर्य-मंगळ त्रिकोण, तुमच्या आचार-विचारांत भव्यता-दिव्यता प्रकट करतील. सारे काही आखीव वेळापत्रकाप्रमाणे चालू आहे असा प्रत्यय येऊ लागेल.

दि. २२ ते २४ अपेक्षित यश मिळेल.

**कुंभ** : भाग्यातील मंगळाने तुमच्या प्रगतीचा आलेख एकदम पालटून टाकला. आता निराशा-माघार-अस्वस्थता-अनारोग्य हे सारे आपण विसरू शकता. गेल्या महिन्यातील सारे पेचप्रसंग आता भराभर सुटायला लागतील. सारी स्थगित कामे गती घेऊ लागतील, वैचारिक संघर्ष मिटेल, इष्टमित्रांची सहानुभूती न मागताही मिळू लागेल.

आजवर निवडणुकीचे क्षेत्र आपणांस निराशाजनक वाटत होते. आता तेच आशादायक दिसू लागेल. आणि दि. २१ ला आपण शिकस्तीचा प्रयत्न केलात तर अपेक्षित यश पदरी पडेलच. प्रवास–बदल–स्थित्यंतर अशाही गोष्टी या काली घडाव्यात.

दि. २१ ते २३ विशेष यश देण्यास काल.

**मीन** : आठव्या मंगळाच्या अनिष्टतेत १२ व्या सूर्याचीही आणखीन भर. कालचक्र उलटे फिरू लागल्यासारखे दिसू लागेल. या कालात खाणं, पिणं, वागणं सारंच पथ्यावर हवं. म्हणजे बेमुदत उपोषणास सुरुवात करा असं माझं म्हणणं नाही !

थोडक्यात सांगतो, काल अनिष्ट आहे. अपेक्षेप्रमाणे यश मिळण्याची लक्षणे कुठेच दिसणार नाहीत. अडखळत धडपडत ठेचकाळतच चालावे लागणार आहे.

या वेळी फक्त मतदान करा. कुणासाठी प्रचार करण्याच्या भानगडीत चुकूनही पडू नका. ज्याच्यासाठी प्रचार कराल त्याचे डिपॉझिट जप्त झालेच म्हणून समजा. इतका तुमचा काल अनिष्ट आहे. प्रकृतीसही जपा.

दि. २२ ते २४ काहीसे अनुकूल दिवस.

●

## □ इंदिराजींचे आश्वासन

मुस्लिम पर्सनल लॉमध्ये सरकार काही परिवर्तन करणार असल्याचा प्रचार खुद्द सरकारी पातळीवरूनच झाल्यामुळं मध्यंतरी मुस्लिम समाजात मोठीच खळबळ उडाली होती. अनेक सभासंमेलनांतून संबंधितांच्या असंतोषाचा आविष्कारही झाला होता, किंबहुना अद्यापही होत आहे. तथापि कोटा राजस्थान येथील मुस्लिमांचे शिष्टमंडळाने पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांची याबाबत भेट घेतली असता, त्यांनी सरकार असे काही करणार नाही, असे आश्वासन दिले आहे. याबाबत बोलताना त्या म्हणाल्या, "मध्यंतरी लोकसभेत मुस्लिम पर्सनल लॉबाबत काही सभासदांनी प्रश्न विचारल्यावरून आम्ही प्रांतिक सरकारांशी याबाबत सल्लामसलत केली होती, इतकंच."

आता वस्तुस्थिती काय आहे, कोणास ठाऊक. परंतु पंतप्रधानासारख्या ज्येष्ठ व श्रेष्ठ व्यक्तीनं यासंबंधी आश्वासन दिलेलं असल्यामुळं ती बाब विश्वासार्ह मानण्यास प्रत्यवाय नसावा. कारण जगातील कुठलीही मोठी व्यक्ती विश्वासभंग करीत नसते आणि समजा, त्यांचेकडून वचनभंग झालाच तर भविष्यात त्याविरुद्ध आवाज उठविण्यास मुस्लिम समाज मोकळाच आहे. परंतु केवळ विरोधी पक्ष म्हणतो म्हणून सरकारच्या या आश्वासनाबाबत अविश्वास दाखविणे व आपली चळवळ चालू ठेवणे गैर आहे. कारण निवडणुकीच्या या मोसमात सरकारविरुद्ध लोकमत वळविण्यासाठी विरोधी पक्षांना कसलेही भांडवल आज हवेच आहे. तेव्हा मुस्लिम बांधवांनी यामागील राजकारणाचे बळी ठरू नये व मुस्लिम पर्सनल लॉविषयक आपली चळवळ त्वरित बंद करावी, अशी आमची सूचना आहे. **'इन्किलाब,'** २५-१-६७

## □ दिशाभूल

मुस्लिम पर्सनल लॉप्रमाणेच विरोधी पक्ष उर्दू भाषेबाबत मुस्लिमांची दिशाभूल करीत आहेत. काही विरोधी पक्ष असा प्रचार करीत आहेत, की महाराष्ट्रात उर्दू भाषेची गळचेपी होते आहे. तिच्या विकासाला पद्धतशीर पायबंद घातला जात आहे, वगैरे. उलट, खुद्द उर्दू भाषेचे समर्थक व संरक्षक मंडळी म्हणत आहेत, की उर्दूला कुठलाच विरोध होत नाही, किंबहुना उर्दूची काही समस्याच महाराष्ट्रात अस्तित्वात नाही! दुसऱ्या राज्यांपेक्षा महाराष्ट्रात उर्दूला अधिक मान व स्थान आहे!

लोकशाहीत पक्षापक्षात मतभेद संभवतात. किंबहुना, विरोध हे निकोप लोकशाहीचे लक्षण आहे. परंतु एखाद्या पक्षाला विरोध करताना अशा प्रकारची ढाल पुढे करण्याचे काय प्रयोजन? काँग्रेसला विरोध करण्यासाठी उर्दूचे निमित पुढे करण्याचे काय कारण? परंतु साधनशुचितेच्या गप्पा मारणारे विरोधक स्वतःच आपल्या क्षुद्र हेतूंसाठी मुस्लिम समाजात असे विष पेरीत आहेत. बिहारच्या 'अंजुमने तरक्की उर्दू' या संघटनेला विरोधकांनी वशही केले असून तिला निवडणुकीच्या आखाडयात उतरविण्याचा खटाटोप ते करीत आहेत.

परंतु अद्याप अविकृत अशी माहिती उपलब्ध झालेली नसल्यामुळं 'अंजुमने तरक्की उर्दू' प्रत्यक्षात काय करते, ते पाहूया! **इन्कलाब, ३०–१–६७**

## □ वृत्त-वितरणातील पथ्ये

'मुरादाबाद येथे दि. २३–१–६७ रोजी लाकूड तोडण्यावरून दोघा मुलांत भांडण जुंपले आणि ईदच्या नमाजेहून परतणाऱ्या काही लोकांनी हत्यारी पोलिसांवर हल्ला केल्यामुळे दंगल उद्‌भवली व तीत अनेक पोलिस जखमी झाले. १–२ मोटारींना आग लावण्यात आली......' इत्यादी आशयाचे वृत्त सरकारी वृत्त वितरण संस्थेकडून सर्वत्र प्रसारित झाले होते. परंतु दंगलीचे खरे कारण दिलेले नव्हते, त्यामुळे लोकांना ती एक किरकोळ बाब वाटली. वृत्त देणाऱ्याने प्रस्तुत वार्ता देताना तिला जातीयवादाची 'रंगरंगोटी' केली नव्हती म्हणून बरं, नाहीतर इतरत्रही त्याचे पडसाद उमटल्याशिवाय राहिले असते काय? कारण त्यानंतर सदर दंगलीची कारणमीमांसा करताना यू. पी. तील पत्रांतून तिच्यामागे जातीयवाद्यांचा पूर्वनियोजित कट होता व तदद्वारा मुरादाबादेत दंगल उठविण्याचा त्यांचा मानस होता, असे प्रसिद्ध झाले आहे.

या घटनेला विशेष महत्त्व नाही. कारण दंगेधोपे ही हल्ली एक दैनंदिन बाब होऊन बसली आहे. परंतु यावरून सरकारी वृत्तवितरण संस्थेवर केवढी जबाबदारी आहे, हे सिद्ध होते. कुठलीही बातमी अतिरंजित, पक्षपाती, अपूर्ण, निष्कारण घबराट निर्माण करणारी नाही ना, याची या संस्थेनं प्रथम खात्री करून घेऊन मगच ती प्रसारित करायला हवी. त्यामुळे निष्कारण होणारे 'गैरसमज टळतील. तसेच शक्यतो अशा घटनेची कारणेही त्वरित जाहीर करावीत. म्हणजे कायदा मोडण्यास टपलेल्या गुंडांचे फावणार नाही देशातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्यास मदत होऊ शकेल!

**'इन्कलाब' २७–१–६७**

# भिंतीच्या तुंबड्या

सुधाकर राजे

## □ कायदा गाढव आहे – कुत्रा नाही

कायदा गाढव आहे, आणि गाढवाची व कुत्र्याची विशेष मैत्री असल्याचे इसापनीतीतदेखील आढळत नाही; तेव्हा कायद्याचे व कुत्र्याचे पटू नये यात नवल काय? थोड्या दिवसांपूर्वी अमेरिकेत एका बाईच्या घरी चोरी झाली, तेव्हा घरात एकच साक्षीदार होता–तिचा कुत्रा. चोराला पकडल्यावर कोर्टात साक्ष देताना बाई म्हणाली, " मी घरी आले अन् मोत्याला विचारले, ' काय झाले ? ' मोत्या मला म्हणाला... " पण आरोपीच्या वकिलाने ताड्कन तेथल्या तेथे तिला थांबवले. " सबूर ! मोत्या काय म्हणाला हे कोर्टाला जमेस धरता येत नाही–कारण तो ऐकीव पुरावा आहे ! " आता बोला ! एखादा नॉर्मल माणूस असता तर म्हणाला असता, " मोत्या काय म्हणाला हे जमेस धरता येत नाही याचे साधे कारण म्हणजे मोत्याला बोलताच येत नाही. " पण या ठिकाणी नॉर्मल माणूस नव्हता, वकील होता. त्याच्या कुशाग्रबुद्धीने अचूक हेरलं की कुत्र्याला माणसासारखे बोलता येत नाही, असली किरकोळ हरकत कोर्टात पचायची नाही म्हणून त्याने माणसाला नव्हे तर कोर्टाला पटेल अशी हरकत पुढे केली–" मोत्याने सांगितलेली हकीकत ' ऐकीव ' पुरावा आहे, सबब बाद समजावी. " अर्थात् एवढी सबळ हरकत सुज्ञ कोर्टाला एकदम पटली, हे अज्ञास सांगणे नलगे.

पण समजा, मोत्याने सांगितलेली हकीकत बाईने सांगितली असती तर ती काय सांगितली असती ? मला वाटते मोत्या म्हणाला असावा..." बरं का बाई, तुम्ही ऑफिसात गेल्यावर मी डॉग-बिस्किटचा ब्रेकफास्ट केला अन् टेलिव्हिजन पाहत बसलो. एकदा वाटले शेजारच्या टिप्याकडे चक्कर मारून यावी; पण टिप्याला त्या डॉग-शोमध्ये पहिले बक्षीस मिळाल्यापासून तो इतका काही चढला आहे की, एक शब्ददेखील नीट भुंकत नाही. मग पलीकडच्या चंपीकडे जरा डेटिंग करायला

गेलो. मी चंपीशी गप्पा मारीत असताना टिप्या अस्सा डोळे वटारून पाहत होता, पण मी जाम ढिम दिली नाही. आता तुम्हीच सांगा, चंपी तशी सोशल आहे अन् तिचं अजून काही कुणाशी 'ठरलेलं' नाही,' मग टिप्याला इतका मत्सर का वाटावा ? मी आपला चंपीला कालच्या डॉग-रेसमध्ये पहिले बक्षीस मिळाले म्हणून तिचे अभिनंदन करायला गेलो होतो,—पण तिच्याशी गप्पा मारताना वेळचे भानच राहिले नाही बघा. शेवटी दुपारी भूक लागल्यावर लंचची हाडके चघळायला घरी परतलो तर हा माणूस घरात शिरून कारभार करीत होता. मी त्याच्या अंगावर भुंकणार होतो, पण त्याने मला पाहिल्याबरोबर लगेच रेफ्रिजरेटरमधून रसदार हाडे काढली अन् माझे पान वाढले, आता तुम्हीच सांगा, हाडकांसारखे सुग्रास जेवण स्वतःच्या हातांनी प्रेमळपणे वाढणाऱ्या माणसावर भुंकणे कुठल्या कुत्र्याला शोभेल ? त्यातून तुम्ही मला एका वेळी दोनच हाडके देता, त्याने तर चार वाढली होती. म्हणजे माणूस दिलदार यात शंकाच नाही. आता त्याने कपाट उघडून दोन-चार वस्तू अन् नोटांचे पुडके खिशांत घातले खरे, पण चार चार रसरशीत हाडकांच्या-पुढे असल्या क्षुल्लक गोष्टीला काय महत्त्व द्यायचे, नाही का...? "

## □ आत्महत्येच्या सुखसोयी

अधिक जगण्याची सोय नसलेल्या या जगात आता मरण्याचीदेखील सोय उरलेली दिसत नाही. परवा वर्तमानपत्रात वाचले की, अमेरिकेत एक माणूस जीव देण्यासाठी समुद्रात उडी टाकायला गेला अन् पाणी फार थंड म्हणून परत फिरला! छे, छे. अमेरिकेसारख्या आधुनिक सुखसोयींनी सुसज्ज अशा देशात असली किरकोळ सोयदेखील नसावी हे किती लांच्छनास्पद आहे. तेच हिंदुस्थानाकडे बघा. तुम्ही म्हणाल तेथे, म्हणाल तेव्हा ही सोय उपलब्ध आहे. उदाहरणार्थ, रेल्वे मंत्री पाटलांच्या कारकीर्दीत पुण्याहून मुंबईसारख्या दूरच्या ठिकाणी आगगाडीने जाणारा प्रत्येक माणूस अखेरची निरवानिरव करून जातो, असे माझ्या ऐकिवात आहे. बिहारमध्ये तर या सोयीची बहारच आहे. प्रभुदत्त ब्रह्मचारी अन् शंकराचार्यां-सारख्या उपोषण-तज्ज्ञांना सत्तर सत्तर दिवस प्रयत्न करूनही जे जमले नाही ते बिहारमधला सामान्य शेतकरी सहजगत्या करून दाखवतो. शिवाय निरनिराळ्या शहरांतून बसगाड्यांचे ड्रायव्हर, कोकाकोलांत पाली व पेनिसिलिन्‌मध्ये पाणी मिसळणारे व्यापारी इत्यादी सोयी आहेतच. म्हणून म्हणतो, मुर्दाबादच्या सुखसोयी झिंदाबाद !

●

# मला क्षमा करा !

"हे हिन्दवासीयांनो ! मला क्षमा करा ! ! मी जे जे काही केलं ते ते फक्त स्वातंत्र्य मिळवण्यासाठीच केलं, पण मी अपेशी ठरलो. माझ्या देश-बांधवांनो ! मला यश मिळालं नाही, मी तुमच्यासाठी काहीही करू शकलो नाही– मला क्षमा करा ! क्षमा करा ! !"

धीरगंभीर वाणी, देखण्या, धिप्पाड शरीरावर पांढरा शुभ्र पोशाख. श्वास रोधून धरणारं वक्तव्य अन् समोर कोर्टातली गच्च गर्दी. काळीज हलवून सोडणारी वासुदेव बळवंतांची ती वाक्यं — "मला क्षमा करा–मी तुमच्या-साठी काहीही करू शकलो नाही !"

मायभूमीच्या स्वातंत्र्यासाठी ज्यानं जान कुर्बान केली, सर्वस्वाचा होम केला, सोन्यासारखा संसार सोडून जो वनवासी झाला, त्या वीराचे हे शब्द. स्वराज्य आणि स्वातंत्र्य हे शब्दही भारतीयांना ठाऊक नव्हते त्या वेळी, स्वातंत्र्यासाठी रात्रंदिवस तळमळणाऱ्या, झगडणाऱ्या पहिल्या स्वातंत्र्य-सैनिकाचे हे शब्द ! ज्यानं भारताच्या मुक्तीसाठी कष्टांची आणि प्रयत्नांची पराकाष्ठा केली. पण लोकांनीच पुरेशी साथ दिली नाही त्या हुतात्म्याचे हे शब्द—"मला क्षमा करा ! मी तुमच्यासाठी काहीही करू शकलो नाही !"

—बाहेर कर्कश भोंगा वाजतो आणि नकळत दचकून हातांतलं पुस्तक मिटतं. भोंग्यांतून कर्कश शब्द उधळतात : "मते कुणाला ?"

माझे कान शहारतात. "मते द्या—आम्हांलाच मते द्या." "आम्हांला अभिमान वाटतो की, गेल्या पाच वर्षांत जनतेच्या कल्याणासाठी........."

मी खिडकी बंद केली अन् समोर पडलेलं ताजं वृत्तपत्र उघडलं.

—ट्रकचा अपघात, ग्रामसेविकेवर बलात्कार, विद्यार्थ्यांची दंगल, शिक्षकास मारहाण, गुप्त हेराला आश्रय, चोरटे सोने जप्त, काळाबाजार, दुष्काळ.

माझं डोकं बधिर झालं. हे सारं ज्या देशात घडतंय त्या देशाच्या प्रगतीची जगभर जाहिरात ! ही आमची अलौकिक प्रगती—आमच्या देशाचं हे विलक्षण कल्याण—आमच्या यशस्वी वाटचालीचं हे प्रतीक म्हणे !

यासाठीच तुम्हांला इतका पगार, इतका अधिकार, तुमच्या दिमतीला मोटारी, तुमच्या स्वागताला कमानी आणि आमच्या दुष्काळातसुद्धा तुमच्या-साठी जंगी शानदार मेजवान्या ! तरीही हरकत नाही. पण वासुदेव बळ-वंतांच्या देशबांधवांनो ! एकदा–निदान एकदा–तरी तुमच्या जनतेला सांगा–

"मी तुमच्यासाठी काहीही करू शकलो नाही—मला क्षमा करा !"

—सौ. श. शि. फडणीस

# [ एक सिंहावलोकन पा. २४ वरून ]

[ एक सिंहावलोकन पा. २४ वरून ]

**मोहरे कोसळले**

काँग्रेसमधून बाहेर पडलेला समाजवादी गट मोठ्या उमेदीने निवडणुका लढवीत होता आणि जयप्रकाश नारायण, नरेन्द्र देव आणि राममनोहर लोहिया यांसारखी मातब्बर मंडळी त्यात असल्याने ब्रिटिश मजूर पक्षाच्या धर्तीवर हा गट भारतीय राजकारणात कितपत स्थान मिळवतो या बाबतींत सर्वांच्याच अपेक्षा उंचावल्या होत्या. पण प्रत्यक्षात समाजवाद्यांनी लोकसभेसाठी लढविलेल्या २९५ जागांपैकी अवघ्या १२ जागा जिंकून सर्वांची निराशा केली. एकेकाळी काँग्रेसचे अध्यक्षपद गाजविलेले आचार्य कृपलानी यांनी स्थापलेल्या नव्या कृषक-मजदूर प्रजापक्षानेही असाच अपेक्षाभंग केला. लढविलेल्या १३७ जागांपैकी फक्त ९ च जागा पक्षाच्या पदरात पडल्या. अशोक मेहता, भाई डांगे, आचार्य कृपलानी, डॉ. आंबेडकर, डॉ. ना. भा. खरे, प्रभावती राजे, पंडित कुंझरू आणि ह. वि. कामथ, कमलादेवी चटोपाध्याय असे काँग्रेसविरोधकांतील एकेक मोहरे या पहिल्या सामन्यातच कामी आले. विरोधकांपैकी लक्षात येण्यासारखा विजय मिळाला तो फक्त डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांनाच.

विरोधकांप्रमाणेच काँग्रेसलाही या पहिल्या निवडणुकीत धक्के बसलेच. मध्यभारत, मद्रास, बिहार, राजस्थान व पंजाब या राज्यांचे मुख्यमंत्रीच पराभूत झाले. मोरारजी देसाईही याच निवडणुकीत पडले. मजूरनेते खंडूभाई देसाई आणि के. संथानम् यांचाही पराभव झाला.

या पहिल्या ऐतिहासिक सार्वत्रिक निवडणुकीत काँग्रेसच्या खालोखाल संसदीय मतांची टक्केवारी कुणाला मिळाली असेल तर ती अपक्ष उमेदवारांना. एकूण मतदानाच्या ४५ टक्के मते काँग्रेसला तर ३२.२० टक्के मते या अपक्षांना मिळाली. चार विरोधी पक्षीयांना मिळूनदेखील अपक्षांएवढी मते मिळाली नाहीत. त्यांची एकत्र मते होतात अवघी २३ टक्के ! विरोधी पक्ष अपक्ष उमेदवारांना आपलेसे करू शकले नाहीत, असेच यावरून दिसते.

**अपक्षांकडून पक्षांकडे**

परंतु पहिल्या दोन्ही सार्वत्रिक निवडणुकीत किती मतदारांनी भाग घेतला ? लोकशाहीचा पहिला प्रयोग म्हणून उत्तर विशेष निराशाजनक नसले तरी ते उत्साहवर्धकही नाही. पहिल्या निवडणुकीत अवघ्या ५१.१५ टक्के मतदारांनी मतदान केले तर दुसऱ्या निवडणुकीत फक्त ४७.५४ टक्के मतदारांनी आपला हक्क बजावला ! १९५७ च्या निवडणुकीत मतदार संख्या वाढली २ कोटी ४ लाखांनी आणि मतदान वाढले फक्त ३५ लाखांनी. मतदारांचा अनुत्साहही वाढला असला पाहिजे. तिसऱ्या निवडणुकीत मात्र ५४·८० टक्के मतदान झाले.

या तीनही सार्वत्रिक निवडणुकांमध्य आपले अस्तित्व आणि व्यक्तित्व कायम टिकवून असलेले पक्ष म्हणजे काँग्रेस, कम्युनिस्ट आणि जनसंघ. समाजवादी गट दर वेळी आपापसांत वेगवेगळया युती करू लागल्याने एक साचेबंद पक्ष म्हणून मत-दारांपुढे तिन्ही निवडणुकांत सलगपणे आलाच नाही. अपक्षांनी पहिल्या निवडणुकीत जी ३२·२० टक्के मते खाल्ली ती १९५७ मध्ये २६.९६ टक्क्यांवर उतरली आणि गेल्या निवडणुकीत तर ही टक्केवारी २४.२० वर घसरली व संसदेत अपक्षांना अनुक्रमे ८३, ७३ व ६० जागा मिळाल्या.

| | १९५२ | १९५७ | १९६२ |
|---|---|---|---|
| काँग्रेस | ४५ % मते (३६४ जागा) | ४७·७८ (३७१) | ४४·७२ (३५८) |
| कम्युनिस्ट | ३·३ (१६) | ८·९२ (२७) | ९·९४ (२९) |
| जनसंघ | ३·१ (३) | ५.९३ (४) | व ६·४४ (१४) |

अपक्षांचे मत घटून निश्चित विचारप्रणाली जोपासणाऱ्या पक्षांची मते वाढीला लागली हे या कोष्टकावरून स्पष्ट होते. लोकशाहीच्या दृष्टीने हे निश्चित उत्साह-जनक होय. समाजवादी गटांच्या दुर्बलतेने व त्यांच्या विचारप्रणालीतील अस्थिरते-मुळे त्यांना मिळणारी मते मात्र घटत गेली. तिसऱ्या निवडणुकीत मतदारांची मतदानाची टक्केवारी वाढली पण अद्यापही ती विशेष आशादायक नाही पाश्चात्य देशांतून ८० ते ९० टक्क्यांपर्यंत मतदान जाते. गोव्यातील जनमत कौलाचे मत-दानही ८५ टक्क्यांवर गले होते. एवढे उच्च मतदान झाले तरच लोकशाही खऱ्या अर्थाने काम करू लागते.

तसेच गेल्या तीनही सार्वत्रिक निवडणुकींत वाया गेलेल्या मतांची संख्या मोठी होती. प्रत्येक मतामागे कितीतरी जणांची आर्थिक, मानसिक व शारीरिक शक्ती वाया जाते. ही परिस्थिती बदलली पाहिजे व मतदानाची पूर्ण माहिती सर्व मत-दारांना झाली पाहिजे.

## तंत्रात सुधारणा

देशातील निवडणुकीची तंत्रे अनुभवाने सुधारत आहेत. जगातील सर्वांत मोठी निवडणूक घेणारे आपल्या देशातील निवडणूक मंडळ आता अधिकाधिक सुधारणा करीत आहे. पहिली निवडणूक १२० दिवस चालली तर दुसरीला २० दिवस लागले. १९६२ ची निवडणूक १० दिवसांत आटोपण्यात आली तर येत्या सार्वत्रिक निवड-णुकीचे वेळापत्रक अवघ्या आठवडाभरात उरकणार आहे. पहिल्या निवडणुकीत मतदानाचा खर्च दरडोई साडे नऊ आणे होता तर दुसरीत तो पाच आण्यांवर आला.

आपापली अनामत रक्कम जप्त होऊ न देण्याचीही दखल आता अधिकाधिक उमेदवार घेत आहेत. १९५२ मध्ये संसद व विधानसभा मिळून एकूण ९११८ उमेद-वारांनी २१ लक्ष १० हजार रुपयांची अनामत रक्कम घालविली तर गेल्या निवड-णुकीत ७,१९४ उमेदवारांनी १७ लक्ष ५६ हजार रु. त्यात गमावले. पहिल्या

निवडणुकीत राज्यव्यापी पक्ष ५९ होते! ती संख्या १९५७मध्ये १९ वर आली
थोडक्यात म्हणजे तीनही निवडणुकींच्या विविधांगांकडे दृष्टिक्षेप टाकता भारतीय लोकशाहीची प्रगतीच चालू आहे, असे दिसते. मात्र मतदारांनी जागे होऊन अधिक संख्येने मतदान केले पाहिजे व चैतन्य आणून दिले पाहिजे. □

## लोकशाहीचा चालक कोण ?

मतदार जो जो अधिक वाचू लागतो, विचार करू लागतो, चिकित्सक दृष्टीने आवती भोवती पाहू लागतो तो तो लोकशाहीविषयी तो अधिक उदास बनू लागतो की काय कुणास ठाऊक. निदान मला तरी असे वाटते. चांगला शिकलेला चार वर्तमानपत्र वाचणारा, स्वतःचे विचार मोकळेपणाने इतरांना सांगणारा सुविद्य मतदार 'उदास' बनतो, लोकशाहीतील ढोंगीपणाबद्दल त्याला वैताग येऊ लागतो. लोकशाहीकडे तो त्रयस्थपणे पाहू लागतो. कित्येक वेळा तो मतदानाचा हक्कही बजावत नाही. कारण त्याला वाटतं आपण खऱ्या अर्थानं मतदानाचे अधिकारीच नाही.

मीही असाच वैतागलेल्या मनःस्थितीत माझ्या मनातील शंकाकुशंकांचे समाधान करून घेण्याच्या हेतूने राज्यशास्त्राच्या एका विद्वान अभ्यासकाकडे गेलो. वेळ नसतानाही त्यांनी माझ्याशी चर्चा केली, बऱ्याच प्रश्नांची तात्त्विक उत्तरे दिली पण अखेरीस बोलण्याच्या ओघात त्यांनी एक स्फोट केला.

ते म्हणाले, "अशा वाचनामुळे व विचारांमुळे लोकशाहीकडे उदासीन दृष्टीने पाहणाऱ्या चिकित्सक मतदारांची संख्या अमेरिकेतही मोठी आहे. १९५८ साली अमेरिकेत झालेल्या संशोधनावरून असे दिसून आले आहे की, समाजातील १७ टक्के मतदार सध्याच्या लोकशाहीला कंटाळले आहेत. त्यात त्यांना आदर्श दिसत नाही. हा मतदार जो अभ्यासू आहे पण म्हणूनच लोकशाहीकडे उदासीन दृष्टीने पाहतो, तो केवळ स्वतःची उन्नती पाहतो, वर्तमानपत्रे केवळ करमणूक म्हणून वाचतो आणि विशेष म्हणजे साऱ्या समाजाचा सहावा हिस्सा असलेला हा सुबुद्ध 'उदास' मतदारच लोकशाहीला आवश्यक आहे. तोच लोकशाही जगवतो आहे. सारेच जर चिकित्सक दृष्टीने लोकशाहीकडे पाहू लागले तर लोकशाहीच कोलमडेल–"

या उत्तरामुळे मला एक गोष्ट निश्चित कळली की, मी जसजसा अधिक वाचेन, विचार करेन तसतसा लोकशाहीबाबत उदास बनेन. पण माझी उदासीनताच लोकशाहीला पोषक आहे. आवश्यक आहे. म्हणजे अलिप्त राहूनही मीच खऱ्या अर्थाने लोकशाही जगवतो आहे! – विजय डोंगरे

# एक दृष्टिक्षेप

## काँग्रेसमधील
## जोरदार अंतर्गत बंडखोरी !

अंतर्गत दुफळीमुळे बेजार झालेली नेतृत्वहीन काँग्रेस हे निवडणुकांचे पहिले वैशिष्टच. आजच्याएवढा काँग्रेसबद्दलच्या प्रखर असंतोष देशात कधीच नव्हता. गेल्या तिन्ही निवडणुका काँग्रेसने अगदी सरसकट सहजपणे जिंकल्या. या तिन्ही निवडणुकांत काँग्रेस पक्ष अगदी हक्काने आणि आत्मविश्वासाने मते मागत होता. या वेळेस तसे नाही. काँग्रेस या वेळी बचावात्मक पवित्र्यात आहे.

काँग्रेसची स्थापना झाली ती एक राजकीय पक्ष म्हणून नव्हे तर चळवळ म्हणून. स्वातंत्र्यप्राप्तीसाठी स्थापन झालेल्या या चळवळीचे रूपांतर स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सत्ता राबवणाऱ्या राजकीय पक्षात झाले आणि स्वातंत्र्याच्या ध्येयाने वेडे होऊन या चळवळीत शिरलेल्या भिन्न भिन्न व परस्परविरोधी मतांच्या लोकांचे स्वातंत्र्यानंतर काँग्रेसमध्ये कडबोळे निर्माण झाले. ज्यांचे मतभेद तीव्र होते ते समाजवादी, कृषक पक्ष या स्वरूपात काँग्रेसबाहेर पडले. पण तरीही विभिन्न मतांचे पुरस्कर्ते काँग्रेसमध्ये बऱ्याच मोठ्या प्रमाणात सत्तेच्या आश्रयाने राहिले. पं. जवाहरलाल नेहरू, सरदार पटेल यांच्यासारखे विशाल व्यक्तित्वाचे नेते जोपर्यंत या अंतर्गत मतभिन्नतेवर पांघरूण घालायला होते तोवर ठीक होते. पं. नेहरूंच्या निधनानंतर या परस्परविरोधी शक्तींना लगाम घालायला कोणी उरले नाही. आणि आज काँग्रेसच्या रथाला जुंपलेले नेतृत्वाचे काही घोडे डावीकडे, काही घोडे उजवीकडे तर काही आणखी भलत्याच दिशेला रथ ओढण्याचे प्रयत्न करीत आहेत.

काँग्रेसमधील या दुहीला आणि आतील भ्रष्टाचाराला कंटाळून बरेच काँग्रेस कार्यकर्ते या निवडणुकीच्या निमित्ताने संघटनेबाहेर पडले आहेत. हरेकृष्ण मेहताब, नभकृष्ण चौधरी, हुमायून कबीर, अजय मुकर्जी यांसारख्या जुन्या निष्ठावंत नेत्यांनी काँग्रेसच्या बाहेर पडून जन-काँग्रेस नामक नवा पक्ष स्थापन करून

काँग्रसला मोठा धक्का दिलेला आहे. जन-काँग्रेस हा राज्या-राज्यांतून बाहेर पडलेल्या बंडखोर काँग्रेसजनांचा पक्ष आहे. केरळातून 'केरला काँग्रेस' आधीच बाहेर पडली होती. बंगालमध्येही बंडखोर 'बांगला काँग्रेस' निर्माण झाली होती, ओरिसातूनही मोठ्या संख्येने काँग्रेस कार्यकर्ते बाहेर पडले. हे सर्व आणि इतर राज्यांतील असंतुष्ट एकत्र येऊन हा नवा पक्ष तयार झाला. पक्ष म्हणून या शक्तीला तसे महत्त्व नसले तरी काँग्रेसवर प्रहार करण्याचे आयुध म्हणून विरोधी पक्षांना जन-काँग्रेसचा चांगला उपयोग आहे.

## ओरिसात विशेष जोर

हे बंडखोर काँग्रेसजन खरी महत्त्वाची भूमिका वठवीत आहेत ती ओरिसा राज्यात. येथील जन-काँग्रेसच्या कण्याभोवती उभे राहूनच सारे विरोधी पक्ष काँग्रेसला येत्या निवडणुकीत पराभूत करण्याच्या बेतात आहेत. ओरिसा राज्यात पूर्वी गणतंत्र परिषदेचा जोर होता. परिषद स्वतंत्र पक्षात विलीन झाल्याने आता स्वतंत्रांचा जोर वाढलेला आहे. जन-काँग्रेसने एका बाजूला स्वतंत्र पक्षाशी आणि दुसऱ्या बाजूला इतर डाव्या पक्षांशी निवडणुकीपुरती हातमिळवणी केल्याने काँग्रेसचा पराभव होण्याची शक्यता वाढली आहे. निवडणुकीनंतर जन-काँग्रेस आणि स्वतंत्र यांचे संयुक्त सरकार सत्तेवर येण्याचा संभव आहे. ओरिसा काँग्रेस आधीच भ्रष्टाचाराने बुजबुजली. त्यात नभकृष्ण चौधरी, हरेकृष्ण मेहताब यांसारखे ज्येष्ठ नेते काँग्रेसला सोडून गेलेले. अशा परिस्थितीत हा संयुक्त हल्ला ओरिसातील बिजू पटनाइकांसारखे मुरब्बी काँग्रेस नेते कितपत पचवू शकतील, याची शंकाच आहे.

ओरिसा सोडून इतरत्र बंडखोर काँग्रेसचा प्रभाव फारसा नाही. केरळमध्ये थोडासा आहे. इतर ठिकाणी बंडखोर उमेदवार स्वतंत्रपणे बऱ्याच ठिकाणी निवडून येऊ शकतील. पण एक संघटित शक्ती म्हणून बंडखोर काँग्रेस ओरिसातच खरे कार्य करीत आहे.

ज्या काँग्रेसमध्ये प्रच्छन्न भांडवलवादाचा पुरस्कार करणारे श्री. स. का. पाटील आहेत, त्याच काँग्रेसमध्ये टोकाच्या समाजवादाचा पुरस्कार करणारे मेननही होते. श्री. मेनन काँग्रेसमधून बाहेर पडले ही या निवडणुकीतील मोठी घटना. श्रीमती गांधी आणि कामराज श्री. मेनन यांच्या बाजूचे होते हे त्यांनी वेळोवेळी केलेल्या वक्तव्यांवरून जाहीर होते. या दोघांचा श्री. पाटील यांनी पराभव केला. आता निवडणुकीनंतर काँग्रेसमधील या भिन्न मतप्रवाहांचे वेगाने ध्रुवीकरण (पोलरायझेशन) होणार हे निश्चित. आतापर्यंत हे टळले होते. निवडणुकीनंतर हे ध्रुवीकरण होणे अटळ आहे.

# डाव्यांच्या निकराच्या आघाड्या

निवडणुकीचे आणखी एक वैशिष्टच म्हणजे कॉंग्रेसचा पराभव करण्याच्या इरा-द्याने विरोधकांनी उभारलेल्या संयुक्त निवडणूक आघाड्या. डाव्या आणि उजव्या पक्षांनी ठिकठिकाणी अशा आघाड्या उभारल्या आहेत. डाव्यांचा प्रयत्न विशेष नजरेत भरण्यासारखा आहे. राष्ट्रीय पातळीवर कॉंग्रेस आणि विरोधी उमेदवार असा सर्वत्र सरळ सामना घडवून आणण्याचा या डाव्या पक्षांचा इरादा होता. पण उजव्या पक्षांशी संधान बांधू न शकल्याने आणि काही ठिकाणी आपसातील फुटी-मुळे हे साध्य झाले नाही. तरीदेखील सबंध देशभर निवडणुकीची एकसंध आघाडी उभारून कमीत कमी डावी मते तरी फुटू न देण्याचा जोराचा प्रयत्न डाव्या पक्षांनी प्रामाणिकपणे केला आहे. काही काही ठिकाणी तात्त्विक मतभेद बाजूला सारून काही उजवे पक्षही डाव्यांच्या या आघाडीत सामील होऊन कॉंग्रेस विरोधाला सज्ज झालेले आहेत. परंतु अपक्ष उमेदवारांमुळे अनेकरंगी सामने काही टळू शकलेले नाहीत. देशात लोकसभा व विधानसभा मिळून एकूण १८ हजार उमेदवार निवड-णुका लढवीत आहेत. त्यातील ६ हजार उमेदवार अपक्ष आहेत.

डावे कम्युनिस्ट विरुद्ध उजवे कम्युनिस्ट या झगड्यांमुळे आंध्र व बंगाल या राज्यांत अशा संयुक्त आघाड्या प्रभावी झाल्या नसल्या तरी कॉंग्रेसविरोधाखातर बऱ्याच ठिकाणी कम्युनिस्टांनीही आपली भाऊबंदकी बाजूला ठेवली आहे. प्रजा-समाजवादी पक्षाने मात्र या डाव्या आघाडीत कुठेच पाय ठेवला नाही. या डाव्या आघाड्यांशिवाय बऱ्याच राज्यांत डाव्या उजव्या पक्षांनी केवळ कॉंग्रेस पराभवासाठी आपले तात्त्विक संघर्ष बाजूला ठेवून परस्परांविरुद्ध उमेदवार उभे करायचे नाहीत, असे ठरविले आहे. आणि संधी मिळाली तर तात्त्विक मतभेद बाजूला सारून संयुक्त सरकारे स्थापण्याचीही काही अपवाद सोडून सर्वांनी तयारी दर्शविली आहे.

कॉंग्रेसविरोधासाठी सर्व विरोधी पक्ष मनापासून एकत्र आल्याचे उदाहरण मद्रास राज्यात सापडते. स्वतंत्र पक्ष, डावे कम्युनिस्ट, प्रजासोशॅलिस्ट आणि द्रविड मुन्नेत्र कळघम यांसह सात विरोधी पक्ष आपापली तत्त्वे बाजूला ठेवून कॉंग्रेस विरोधासाठी इथे एका ठिकाणी जमले आहेत. त्यांचे नेतृत्व आहे द्रविड पक्षाकडे आणि मद्रास-मधील कॉंग्रेसचा खरा प्रतिस्पर्धी पक्ष तोच आहे. उजवे कम्युनिस्ट आणि जनसंघ यांना राज्यात काहीच स्थान नसल्याने ते या आघाडीत नाहीत. या सात पक्षांनी एकमेकांच्या विरुद्ध कुठेही उमेदवार उभे केले नाहीत आणि अनेक अपक्ष उमेदवार असूनही लोकसभेच्या ३९ जागांपैकी १० ठिकाणी आणि २३४ विधानसभा जागां-पैकी ५० ठिकाणी आघाडी आणि कॉंग्रेस असा सरळ सामना आहे.

त्यामुळे मद्रास विधानसभेतील कॉंग्रेस उमेदवारांची संख्या नक्कीच कमी होईल.

सध्याच्या २०६ च्या विधानसभेत काँग्रेसच्या १३९ आणि द्रविड पक्षाच्या ५० जागा आहेत. आघाडीच्या भक्कमपणामुळे विरोधकांचे बळ मद्रास विधानसभेत बरेच वाढणार आहे.

डाव्या विरोधी पक्षांनी अशीच भक्कम आघाडी केरळमध्ये उभारली आहे. आणि ही आघाडी राज्यात काँग्रेसचा पराभव करणार हे जवळजवळ निश्चित आहे. फक्त संयुक्त सरकार स्थापन करताना आघाडीत पुन्हा कोणती भांडणे उद्भवतात या बाबतीत केरळीय जनता आधीपासूनच हवालदिल आहे. उजवे व डावे कम्युनिस्ट, सं. सो. पा. व इतर डावे पक्ष यांच्या या आघाडीला मुस्लिम लीगचा पाठिंबा आहे तर स्वतंत्र पक्षाने इथे प्रजासमाजवादी आणि 'केरळा काँग्रेस' यांच्या साहाय्याने दुसरी उजवी आघाडी काढली आहे. या दोन आघाड्यांमध्ये समेट होऊ शकला नाही. काँग्रेसला खरे आव्हान आहे ते डाव्या आघाडीकडूनच.

**भाऊबंदकी**

डाव्या-उजव्या कम्युनिस्टांच्या भाऊबंदकीमुळे डाव्या आघाड्यांचा पार धुव्वा उडाला आहे तो आंध्र प्रदेश आणि पश्चिम बंगाल या दोन राज्यांत. आपसांतील भांडणे बाजूला ठेवून हे दोन्ही पक्ष आघाड्यांमध्ये एकत्र आले असते तर बंगाल आणि आंध्रमध्ये—विशेषत: बंगालमध्ये—काँग्रेसची खैर नव्हती.

बंगालमध्ये तर डाव्या आणि उजव्या कम्युनिस्टांनी दोन वेगवेगळ्याच आघाड्या उभारल्या आहेत. केरळनंतर बंगाल हेच राज्य असे होते की जेथे डावे पक्ष काँग्रेसचा पराभव करून सत्तेवर येऊ शकले असते. डाव्या उजव्यांनी इथे हातमिळवणी करून 'बांगला काँग्रेस'चा पाठिंबा मिळवला असता तर काँग्रेसचा पराभव करणे सोपे काम होते. पण आता या वेगळ्या आघाड्या उभारल्या गेल्यामुळे विरोधी मते आपसांत फुटून थोड्याशा बहुसंख्येनेच काँग्रेस विजयी होणार आहे.

आंध्रमध्ये कोणतीच आघाडी काँग्रेसविरुद्ध नाही त्यामुळे काँग्रेस मजेत आहे. डाव्या आणि उजव्या कम्युनिस्टांनी सरळ परस्परांविरुद्ध उमेदवार उभे केलेले आहेत. स्वतंत्र पक्षाने गेल्या पाच वर्षांत आंध्रमध्ये थोडी ताकद कमावली आहे. त्याचबरोबर डाव्या आणि उजव्या दोन्ही कम्युनिस्टांनी आपले बळ वाढविले आहे. पण सारी विरोधी मते फुटणार असल्याने काँग्रेसचा विजय निश्चित आहे.

त्यानंतरची नाव घेण्यासारखी डाव्यांची आघाडी आहे बिहारमध्ये. डावे-उजवे कम्युनिस्ट, सं. सो. पा. आणि इतर सर्व डावे पक्ष इथे एकत्र आले आहेत. पण काँग्रेसला धोका होण्याइतपत डाव्यांची ताकद बिहारमध्ये नाही. त्यांच्याएवढीच ताकद उजव्यांची आहे. दोन गटांत काहीच तह न झाल्याने बिहारमध्येही काँग्रेसच सुरक्षित आहे. आसाम, पंजाब, राजस्थान, हरियाना याही राज्यांत डावे पक्ष एकत्र आले आहेत. पण राजस्थानात खरा जोर आहे उजव्यांचा आणि इतर ठिकाणी काँग्रेसची सरशी ठरलेली आहे.

या निवडणुकीसाठी साऱ्या डाव्या पक्षांनी एकत्र यावे, असे प्रयत्न १९६५ पासूनच सुरू झाले. त्यासाठी अनेक बैठकी झाल्या, बोलणी झाली आणि शेवटी त्यातून हे चित्र निघाले. प्रथमदर्शनी डाव्यांचा हा प्रयत्न अर्धवट वाटत असला तरी असा प्रयत्न भारतव्यापी प्रमाणात या निवडणुकीत प्रथमच होत आहेत, हे लक्षात ठेवले पाहिजे.

**उजव्या आघाड्या**

डाव्या पक्षांप्रमाणे सर्व उजव्या पक्षांनी पद्धतशीरपणे एकत्र येऊन आघाड्या उभारण्याचा निकराचा प्रयत्न केला नसला तरी परिस्थितीच्या दडपणामुळे बऱ्याच ठिकाणी उजवे पक्ष आघाडीसारख्या स्वरूपात एकत्र आले आहेत.

उजव्या आघाडीचा सर्वाधिक जोर आहे तो राजस्थानमध्ये आणि उजव्या पक्षांचे संयुक्त मंत्रिमंडळ बनण्याची सगळ्यात जास्त शक्यता आहे ती राजस्थानमध्येच. राजेरजवाड्यांच्या आणि जमीनदारांच्या बहुसंख्येमुळे स्वतंत्र पक्षाने राजस्थानमध्ये सुरुवातीपासूनच जम बसविला होता. त्यात काँग्रेसच्या जमीनसुधारणाविषयक काही घाईच्या धोरणांमुळे साधारण जनमत काँग्रेसच्या विरुद्ध गेलेले. या वेळी जनसंघाचा स्वतंत्र पक्षाला पाठिंबा आहे. गेल्या सार्वत्रिक निवडणुकीत राजस्थानात जनसंघाला १५ आणि स्वतंत्राला ३६ जागा मिळाल्या होत्या. १८६ च्या राजस्थान विधानसभेत काँग्रेसला बरोबर ८८ जागा मिळाल्या होत्या. त्यामुळे काँग्रेसला आपले मंत्रिमंडळ बनवणे फारच जड गेले होते; आता या वेळी काँग्रेसची अधिक नाचक्की झाली आहे. त्यामुळे स्वतंत्र व जनसंघ यांची उजवी आघाडी या वेळी काँग्रेसवर सहज मात करू शकेल, असा कयास आहे.

उजव्या आघाड्यांचे आणखी दोन किल्ले म्हणजे उत्तर प्रदेश आणि मध्यप्रदेश. या दोन्ही ठिकाणी जनसंघाचा विशेष जोर आहे. पैकी उत्तर प्रदेशात उजव्या आघाडीचे संयुक्त सरकार सत्तेवर येण्याचाही संभव आहे. त्याचप्रमाणे गुजरात, पंजाब, हरियाना, हिमाचल प्रदेश आणि जम्मू-काश्मीरमधील जम्मू खोरे यांमध्येही उजव्या पक्षांचा, विशेषत: जनसंघाचा, जोर आहे. पण तिथे खरी ताकद काँग्रेसमध्ये असल्याने या निवडणुकीत तरी उजव्यांना आपली मते पाठविण्यापलीकडे अधिक भूमिका नाही.

## जनसंघ स्वतंत्र आघाडीवर

या निवडणुकीत आणखी एक महत्त्वाची गोष्ट नजरेत भरते. उजव्या पक्षांनी भारतीय राजकारणात मारलेली प्रचंड आघाडी. या निवडणुकीनंतर तर साऱ्या

भारतीय राजकारणाचा कलच उजवीकडे झुकतो आहे की काय, असे वाटण्या-इतपत परिस्थिती निर्माण होईल. तशी चिन्हे आताच दिसू लागली आहेत.

खऱ्या अर्थाने ' उजवा ' म्हणता येईल, असा भारतातील राजकीय पक्ष म्हणजे स्वतंत्रच; परंतु जनसंघ, हिंदुसभा, मुस्लिम लीग, रिपब्लिकन या सर्व पक्षांना भारतात ' उजवे ' मानण्यात येते. त्या दृष्टीने पाहिले तर हिंदुसभादी इतर पक्ष सोडले तर स्वतंत्र आणि जनसंघ या दोन पक्षांनी गेल्या पाच वर्षांत चांगलीच आघाडी मारली आहे. या निवडणुकीनंतर, जनसंघाने केलेल्या प्रगतीचा भरपूर पुरावा मिळेल, असा राजकीय निरीक्षकांचा अंदाज आहे.

जनसंघ हा खरे म्हणजे मध्यमवर्गीयांचा. मध्यममार्गी पण थोडासा उजवीकडेच झुकणारा पक्ष. राष्ट्रीयत्व, भारतीय संस्कृती अशा मध्यमवर्गीय समाजांच्या भावनांना हात घालणारा हा पक्ष. मध्यम व्यापारी आणि शेतकरी यांनाही पक्षाचे आकर्षण आहे. आपल्या संघटनेच्या आणि शिस्तीच्या जोरावर जनसंघाने गेल्या पंधरा वर्षांत आपले अनुयायित्व हळूहळू धीमेपणाने वाढवीत आणले आहे. लोकसभेत आणि राज्य विधानसभांमध्ये जनसंघाला मिळत आलेल्या जागा तिन्ही निवडणुकांमध्ये वाढतच आलेल्या आहेत. पहिल्या निवडणुकीत जनसंघाला लोकसभेत ३ जागा मिळाल्या तर दुसऱ्या आणि तिसऱ्या निवडणुकांमध्ये अनुक्रमे ४ आणि चौदा जागा मिळाल्या. या निवडणुकीत अधिकृत मान्यता मिळवणारा विरोधी पक्ष म्हणून आपण लोकसभेत निवडून येऊ, असा जनसंघाला आत्मविश्वास आहे. त्यासाठी त्याला लोकसभेच्या ५१ च्या वर जागा जिंकाव्या लागतील.

उत्तर प्रदेशातही जनसंघाची प्रगती नेत्रदीपक आहे. लागोपाठ तीन निवडणुकींत एकूण मतांच्या अनुक्रमे दीड टक्के, ९·७ टक्के आणि १५·२९ टक्के मते मिळवून जनसंघाने तिसऱ्या निवडणुकीत या विधानसभेत ४९ जागा मिळवल्या. मध्यप्रदेश विधानसभेत १९५७ साली पक्षाला १० जागा मिळाल्या होत्या तर गेल्या निवडणुकीत हीच संख्या ४१ वर गेली.

स्वतंत्र पक्षानेही गेल्या पांच-सात वर्षांत झपाट्याने प्रगती केली. दुसऱ्या सार्वत्रिक निवडणुकीनंतरचा काळ देशाच्या राजकारणाला कलाटणी देणाराच ठरला. तोवर देशावर साधारणतः डाव्या विचारसरणीचा मोठाच प्रभाव होता. पण दुसऱ्या निवडणुकीनंतर उजव्यांना आशेचे किरण दिसू लागले. स्वातंत्र्योत्तर काळात निर्माण झालेले स्वदेशी उद्योगधंदे आणि व्यापार आता चांगले वाढू लागले होते. बड्या उद्योगपतींची ताकद वाढू लागली होती. आणि त्याचा परिणाम काँग्रेसवरही दिसत होता. या उद्योगपतींचे वर्चस्व असलेले गट आता काँग्रेसमध्ये मूळ धरू लागले होते. आणि त्यामुळे काँग्रेसमध्ये अंतर्गत भांडणांना अधिक वाव मिळू लागला होता. समाजवाद की, मुक्त भांडवलवाद या भांडणाला काँग्रेसमध्ये विशेष धार चढू लागली. आणि अशा परिस्थितीतच मुक्त भांडवलदारी अर्थव्यवस्थेची पाठराखणी करण्याच्या

उद्देशाने स्वतंत्र पक्षाचा जन्म झाला; तोवर या विचारसरणीला उघड पाठिंबा देणारा एकही पक्ष भारतात नव्हता. त्यामुळे स्वतंत्र पक्षाची स्थापना होताच बडे उद्योगपती, भांडवलदार, जमीनदार, संस्थानिक आणि शेतकरी यांचा या नव्या पक्षाला भरघोस पाठिंबा मिळू लागला. त्याचबरोबर जुन्या पदभ्रष्ट संस्थानिकांना आणि राजेरजवाड्यांनाही दिलासा देणारा हाच पक्ष. १९६२ च्या सार्वत्रिक निवडणुकीच्या केवळ एक वर्ष अगोदर पक्षाची स्थापना झाली. पण पक्षाने इतक्या झपाट्याने मूळ धरले की, ६२ च्या निवडणुकीत लोकसभेच्या १८ जागा जिंकून स्वतंत्र पक्षाने सर्वांनाच आश्चर्यचकित करून टाकले. याच निवडणुकीत पक्षाने विधानसभांच्या एकूण १७० जागा काबीज केल्या. राजस्थान, गुजरात, ओरिसा या राज्यांत स्वतंत्र पक्षाचा विशेष जोर. राजस्थानात संयुक्त मंत्रिमंडळ बनणार ते स्वतंत्रांच्याच बळावर.

अन्नधान्याची टंचाई, वाढती महागाई, आणि सातत्याने घसरत चाललेली देशाची आर्थिक परिस्थिती यांमुळे अगोदरच देशात अनेक प्रश्नांवरून घुमसत असलेल्या असंतोषाला धार आलेली आहे. काँग्रेसविषयीची नाराजी आणि तिटकारा सर्वत्र वाढू लागला आहे. या पार्श्वभूमीवर या चौथ्या सार्वत्रिक निवडणुका होत आहेत. काँग्रेसचा बचावात्मक पवित्रा, डाव्या पक्षांची निकराची चढाई आणि उजव्यांची वाढती सरशी ही या निवडणुकीची वैशिष्ट्ये आहेत. वेगवेगळ्या शक्तींनी असे स्पष्ट पवित्रे घेतल्यामुळे या निवडणुकीनंतर तरी भारतीय राजकारणातील गुंतावळा जाऊन वेगवेगळ्या शक्तींचे स्पष्ट ध्रुवीकरण होईल असा निरीक्षकांचा अंदाज आहे.

परंतु काहीही झाले तरी या निवडणुकीत देशात काँग्रेसचा सरसकट पाडाव होण्याची सुतराम शक्यता नाही. वर सांगितल्याप्रमाणे तीन-चार राज्यांमध्ये विरोधी पक्षीयांची संयुक्त सरकारे सत्तेवर येतील, आणि लोकसभेतील काँग्रेस उमेदवारांची संख्याही बरीचशी कमी होईल. पण लोकसभेसह इतरत्र मात्र काँग्रेसच बहुसंख्येने निवडून येणार हे निश्चित. परंतु ही बहुसंख्या गेल्या निवडणुकीपेक्षा कमी झालेली असेल. भारतव्यापी प्रबळ अशा विरोधी पक्षाचा अभाव आणि फुटलेले विरोधी मत यांमुळे काँग्रेस याहीवेळी निःसंशय सुरक्षित आहे. परंतु काँग्रेसच्या दृष्टीनेही शेवटचीच सुरक्षित निवडणूक असेल. पुढच्या निवडणुकांमध्ये काँग्रेसला इतर विरोधी पक्षीयांच्या बरोबरीने जिवाचा आटापिटा करावा लागेल.

●

## तुम्हांस हे ठाऊक आहे का ?

भारतातील पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी १६५ टन लोखंडाच्या २५,८४,९४५ मतपेटचा, १ कोटी २२ लाख ८७ हजार रु. खर्च करून बनवाव्या लागल्या. दुसऱ्या निवडणुकीचे वेळी २१ लाख रुपये खर्चून ३० टन वजन भरलेल्या ४५६ हजार मतपेटयांची भर टाकावी लागली.

तिसऱ्या निवडणुकीचे वेळी वरची बेगमी पुरेशी ठरली.

१९५२ च्या निवडणुकीत ३,८६,८१६, १९५७ च्या निवडणुकीत ६,१६,७०७, १९६२ च्या निवडणुकीत ३,७२,९२३, इतक्या शाईच्या बाटल्या खर्च झाल्या.

१० लाख ७७ हजार रु. चा १८० टन कागद पहिल्या निवडणुकीत, ११ लाख ५२ हजार रु. चा १९७ टन कागद दुसऱ्या निवडणुकीत आणि ११ लाख ५५ हजार रु. चा १७० टन कागद तिसऱ्या निवडणुकीत वापरला गेला.

१९५२ मध्ये १ लक्ष ९६ हजार ८४, १९५७ मध्ये २ लक्ष ३८ हजार ३१, १९६२ मध्ये २ लक्ष २० हजार ४७८ मतदानकेंद्रे उभारावी लागली.


१९५७ च्या निवडणुकीत आंध्रमध्ये सिंहान तर मध्यप्रदेशात काही चित्त्यांनी मतदानकेंद्रांना भेट देऊन चांगलाच गोंधळ उडवून दिला.

MANOOS (Weekly) : 40 Paise : Regd. No. M H–649

प्रगतिपथावरील पुढचे पाऊल...

स्वस्तिक

चप्पल्स



स्वस्तिक रबर प्रॉडक्टस लिमिटेड, खडकी, पुणें ३.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९ नारायण पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. **श्री. ग. माजगावकर**